शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १०१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 17 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-101 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05

# सत्तेवर असल्यामुळेच त्यांना फ्री हिट

## उद्धव ठाकरे : भाजपवर टीकेचे बाण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : देशात काही राज्यांमध्ये निवडणुका चालू आहेत. क्रिकेटमध्ये काही नियम असतात तशीच निवडणुकीत आचारसंहिता असते. शिवसेनेच्या वतीने आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहिले. काही शंकांवर खुलासा होण्यासाठी. निवडणूक आयोगाचे धोरण अनेकदा असे दिसते की भाजपा फक्त सत्तेवर असल्यामुळे त्यांना फ्री हिट द्यायची आणि आम्ही काही केले तर आमची हिट विकेट काढायची. याला मुक्त वातावरणातल्या निवडणुका म्हणता येणार नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत भाजपवर टिकेचे बाण सोडले.**

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, १९८७ साली पार्ल्यात पोटनिवडणूक झाली होती. आमच्याकडून रमेश प्रभू जिंकले होते. भाजपा आमच्या विरोधात होती. ही पहिली निवडणूक हिंदुत्वाच्या मुद्द्यावर लढलीच नाही तर जिंकली गेली. तेव्हा शिवसेनाप्रमुखांचाही मतदानाचा अधिकार ६ वर्षांसाठी काढून घेण्यात आला. कारण हिंदुत्वाचा प्रचार केला. आज मात्र आम्हाला वाटते की निवडणूक आयोगाने आचारसंहितेत बदल केले असावेत. ते केले असतील तर सगळ्यांना ते सारखेच असायला पाहिजेत. ते सगळ्यांना कळले पाहिजेत, असा मुद्दा उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे.

काही महिन्यांपूर्वी कर्नाटकमध्ये निवडणुका झाल्या. तिथे स्वतः मोदींनी बजरंग बली



की जय म्हणून मतदानाचे बटण दाबण्याचे आवाहन लोकांना केले. काल-परवा अमित शाहांनी मध्य प्रदेशात भाजपाला निवडून दिले तर रामलल्लाचं दर्शन फुकट करून दिले जाईल अशी घोषणा केली. आमची मागणी आहे की अमित शाह देशाचे गृहमंत्री आहेत. फक्त मध्य प्रदेश नसून देशभरातल्या राम भक्तांसाठी भाजपाकडून मोफत अयोध्यावारी करून दिली जावी. फक्त २२ जानेवारी रोजी राम मंदिराच्या उद्घाटनावेळीच नाही, तर जेव्हा लोकांना वाटेल, तेव्हा ते दर्शन मोफत घडवून दिलं गेलं पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली.

जर पंतप्रधान मतदान करताना बजरंग बली की जय म्हणण्याचे आवाहन करतायत, तर मग आम्हीही येत्या निवडणुकीत जनतेला आवाहन करतो की जय भवानी, जय शिवाज, हर हर महादेव, जय श्रीराम, गणपती बाप्पा मोरया म्हणून मतदान करावे. ज्या कारणामुळे बाळासाहेब ठाकरेंचा मतदानाचा अधिकार काढून घेण्यात आला होता, तो योग्य होता की आत्ता पंतप्रधान-गृहमंत्री करतायत ते योग्य आहे? आचारसंहितेत बदल केला असेल, तर ते आयोगाने स्पष्ट करावे. आम्ही यासाठी निवडणूक आयोगाला पाठवले आहे, असे उद्धव ठाकरेंनी यावेळी नमूद केले.

### याची किंमत पंतप्रधानांना चुकवावी लागेल

पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रचारसभांमधून काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांना लक्ष्य करत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदींवर हल्लाबोल केला आहे. शरद पवार सध्या माढा दौऱ्यावर असून कापसेवाडीत त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी मध्य प्रदेशातील प्रचारसभांमधून विरोधकांवर परखड शब्दांत टीका करत असल्याबाबत विचारणा केली असता त्यावरून शरद पवारांनी मोदींना लक्ष्य केले. दुर्दैवाने ज्या पद्धतीच्या गोष्टी पंतप्रधान मांडत आहेत, त्या प्रकारचे राजकारण आम्ही कधी पाहिले नाही. मी पंडित जवाहरलाल नेहरूंची भाषणे ऐकली आहेत. तेव्हा मी कॉलेजला शिकत होतो. त्यानंतर इंदिरा गांधी, लाल बहादूर शास्त्रींपासून सर्व पंतप्रधानांची भाषणं मी ऐकली. त्यांनी एक पथ्य असे पाळलं की पंतप्रधान कुठल्याही राज्यात गेले, तर त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांबाबत अनादराने कधीही काही बोलले नाहीत. पण हे पहिले पंतप्रधान आहेत की जे एखाद्या राज्यात जातात आणि तिथे जर इतर पक्षाचं नेतृत्व असेल तर त्यांच्यावर व्यक्तिगत हल्ले करतात. सत्ताधाऱ्यांचा आत्मविश्वास ढळल्यामुळे अशी विधानं केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या पाच राज्यांच्या निवडणुकांदरम्यान हेच चित्र दिसतंय. माझी खात्री आहे की लोक हे मान्य करणार नाहीत. याची किंमत मोदींना चुकवावी लागेल. ज्यावेळी आत्मविश्वास ढळतो, त्यावेळी अशा व्यक्तिगत टीका-टिप्पणी माणूस करायला लागतो. असे कोणत्याही पंतप्रधानांनी केले नव्हते. दुर्दैवाने असे करणाऱ्या व्यक्तीच्या हाती सत्ता आहे. त्याचे परिणाम दिसतील, असे शरद पवार म्हणाले.

# तमिळनाडूचे राज्यपाल नरमले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतातल्या अनेक बिगर भाजपाशासित राज्यांमधील सरकार आणि राज्यपालांमध्ये टोकाचा संघर्ष चालू आहे. महाराष्ट्रातही उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि राज्य सरकारमध्ये मोठा संघर्ष झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यपाल राजकीय हेतू ठेवून राज्य सरकारच्या कामात अडथळा निर्माण करत आहेत, असा आरोप या राज्य सरकारांकडून सातत्याने केल जात आहे. दरम्यान, तुम्ही आगीशी खेळत आहात, अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने बिगर भाजपाशासित राज्यांच्या राज्यपालांची शुक्रवारी कानउघडणी केली. नामधारी प्रमुख म्हणून राज्यपाल विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या वैधतेवर शंका उपस्थित करू शकत नाहीत किंवा सभागृहाने मंजूर केलेल्या विधेयकांवरील निर्णय अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवू शकत नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना खडेबोल सुनावले होते. त्यानंतर आता तमिळनाडूचे राज्यपाल नरमले आहेत.

तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यास विलंब करण्याच्या राज्यपाल आर. एन. रवी यांच्या कारभाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली होती. राज्यपालांनी १२ विधेयके प्रलंबित ठेवल्याच्या तमिळनाडू सरकारच्या आरोपाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश शुक्रवारी दिले होते. या आदेशांनंतर तामिळनाडूच्या राज्यपालांनी प्रलंबित विधेयकांवर निर्णय घेतला आहे. राज्यपाल आर. एन. रवी यांनी १० विधेयके परत केली आहेत. विधानसभेत मंजूर केल्यानंतर ही विधेयके संमतीसाठी राज्यपालांकडे पाठवण्यात आली होती. राज्यपालांकडे एकूण १२ विधेयके प्रलंबित होती. त्यापैकी १० विधेयके त्यांनी परत केली आहेत.

# भारतीय क्रिकेट संघ अंतिम फेरीत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वानखेडे मैदानावर समुद्राच्या साक्षीने रंगलेल्या जुगलबंदीत भारतीय संघाने न्यूझीलंडचं आव्हान मोडून काढत ७० धावांनी विजय मिळवला आणि दिमाखात अंतिम फेरी गाठली. धावांचा महापूर ठरलेल्या लढतीत वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने पाच विकेट्स पटकावत भारताला विजय मिळवून दिला. रनमशीन विराट कोहलीचे विक्रमी ५०वं शतक, श्रेयस अय्यरचे सलग दुसरे शतक यांच्या बळावर भारतीय संघाने ३९७ धावांचा डोंगर उभारला. डॅरेल मिचेलच्या शतकाच्या बळावर न्यूझीलंडने दमदार प्रत्युत्तर दिलं पण दुसऱ्या बाजूने सातत्याने विकेट्स पडत गेल्याने न्यूझीलंडचा प्रतिकार अपुराच ठरला. सेमी फायनलची दुसरी लढत उद्या कोलकाता इथे ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात होणार आहे. त्यांच्यातील विजेत्याशी भारताचा रविवारी मुकाबला होणार आहे. वानखेडेवर लोकल बॉय अर्थात रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी पोषक अशा खेळपट्टीवर रोहित शर्माने न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर जोरदार आक्रमण करत इरादे स्पष्ट केले. रोहित आणि शुबमन गिल जोडीने ७१ धावांची सलामी दिली. टीम साऊदीच्या गोलंदाजीवर केन विल्यमसनने उत्तम झेल घेत रोहितला माघारी धाडले. रोहितने २९ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

# अखेर कांडलीत दारूविक्री झाली बंद!

## पोलिसांच्या आश्वासनाने गुरूजींचे उपोषण स्थगित


आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** कांडली ता. (भोकर) येथे अनेक वर्षांपासून अवैध दारूविक्रीचा सपाटा सुरू होता. व्यसनामूळे अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत. याची दखल घेवून कीर्तनकार तथा सहशिक्षक गंगाधर गीरोड यांनी अमर ऊषोणास प्रारंभ केला होता. पोलीसानी त्वरित दखल घेवून बुधवारी (ता. १५)दारूविक्री बंद केल्याने गूरूजीने ऊपोषण माघार घेतल आहे.

संत तूकडोजी महाराज याच्या विचारांचा प्रभाव असलेल्या कांडली गावात सर्व जाती धर्माचे लोक एकोप्याने नांदत होते. तेथील ग्रामस्थांची आस्था पाहून स्वताह तुकडोजी महाराजांनी दोन वेळा भेट देऊन प्रबोधन केले आहे त्यामुळे ग्रामस्थांना ऊभारी मिळाली. आजही नित्यनेमाने ग्रामगीतेचे वाचन, प्रार्थना असा कार्यक्रम सूरू असतांना काही लोकांनी पैशांच्या लालसेपोटी विनापरवाना देशी दारूची विक्री सुरू केली.परिणामी अनेकांचे संसार धुळीस मिळाले नव्हे तर आजपर्यंत वीस ते तीस ग्रामस्थांना जीव गमवावा लागला. याची सल येथील रहिवासी असलेले समाज प्रबोधनकार सहशिक्षक तथा किर्तनकार गंगाधर गीरोड यांना बोचत होती. आखेर त्यांनी गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी यासाठी बालक दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (ता. १४) गावातील मारोती मंदिरावर अमर ऊपोषण प्रारंभ केले होते.याची दखल घेऊन पोलिस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांनी ऊपोषण स्थळी बूधवारी (ता.१५) भेट देऊन गावातील दारू विक्री बंद करण्यात आली आहे. तेव्हा ऊपोषण माघार घेण्याची विनंती केल्याने गुरूजीने उपोषणस्थगित केले आहे.

> कांडली गावातील काही यूवक बेकार असल्याने चोरीछूपे देशीदारूची विक्री सुरु केली होती .तो व्यवसाय आम्ही पूर्णपणे बंद केला आहे .यापुढे असा कुणीही प्रयत्न केला तर त्याची गय केली जाणार नाही असा सज्जड दम दिला आहे .हा प्रकार कदापी खपून घेतला जाणार नाही .
> **(नानासाहेब उबाळे, पोलिस निरीक्षक, भोकर)**







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आता बघा ना परवा म्हणजे परवा असं म्हणायचं हो. म्हणजे काही दिवसांपूर्वी अस्मादिक ( म्हणजे मी बरं का ! ) मुंबईला गेलो होतो. गाडीत प्रवास करताना काही विक्रेते येतात ( खरं म्हणजे नको इतके, तिकीट काढलेलं असतं त्याच्याबरोबर ही करमणूक फुकट असते ), त्यांची भाषा ऐकून मोठी गंमत वाटते. एक विक्रेता हातात मुलांची खेळणी किंवा स्क्रू ड्राइवर किंवा तसलेच काहीतरी घेऊन येतो. ' दस रुपयेमे आयेगा, बीस रुपयेमे आयेगा.' असलं काहीतरी बोलत असतो. एक जुनं हिंदी गाणं उगाचच आठवलं. ' आयेगा आयेगा. आयेगा आनेवाला. आता येतोच आहेस तर ये बाबा ! विकणाऱ्याच्या हातात आता ती एखादी बाहुली असेल तर ' बीस रुपयेमे आयेगा ' कसं काय ? चक्क लिंगबदल ? त्या बाहुलीला काय वाटेल ? तिला बोलता आलं असतं तर ती म्हणाली असती, ' हम बिलकुल आयेगा नही, अभी हम जायेगा...!' आयेगा नही, आयेगी हवं ना ! पण बिचाऱ्याला कोण सांगणार ! मुंबईतल्या आमच्या एका नातेवाईकाकडे एक कानडी अम्मा काम करत होती. आम्ही त्या नातेवाईकांकडे गेलो की तिला खूप आनंद व्हायचा. ती माझ्या बायकोला म्हणायची, ' तुम आया क्या ?'आम्ही गमतीनं म्हणायचो, 'आया आया. ' तिला काही कामासाठी बाहेर जायचं असलं तर ती म्हणायची ' हम अभी बाहर जाता है, थोडी देर मे वापस आता है, बादमे खाना खाता हैं.' ( येसुदास यांनी गायलेलं ' कोई गाता, मै सो जाता...' हे गाणं उगीचच आठवलं...! ) अशी ही साधी सोपी मजेदार हिंदी ! आमच्या खान्देशी भाषेत सांगायचं तर ' आयेगा ' नाही. ' भेटेल ' असं म्हणतात. खान्देशातील माणसे मुंबईच्या गाड्यांमध्ये अशा प्रकारे विक्रेते म्हणून आले तर ' ही बाहुली वीस रुपयाला भेटेल, हे हेडफोन पन्नास रुपयात भेटतील ' असे ऐकवतील. एक तर मुंबई, पुणेकरांच्या भाषाज्ञानात आणखी भर पडेल. आणि मग त्यांनाही ही ' भेटीलागी जीवा लागलीसे आस ' असे होईल.



## आनंदी पहाट

## सणांमध्ये संवादाची गरज प्रत्येकालाच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या सोशल मिडीयाच्या आभासी जमान्यांत हे नेटवर्क, नीट वर्क करतेच असे नाही. फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर आणि व्हॉटस् ॲप इत्यादींच्या माध्यमांतून आपण एकमेकांशी आणि एकाच वेळी अनेकांशी कनेक्टेड असतो हे खरे आहे, पण परस्परांच्या दुःखात नाही तर सुखांत तरी आपण खरेच कनेक्ट होत नाहीत. त्या कनेक्ट होण्यांत खरेच थेट संवादाचे सुख मिळतेच असे नाही. ह्या माध्यमातून पुरावा निश्चितच मिळेल पण दुरावा वाढतोय यांत यत्किंचितही शंका नाही. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या आपल्या केवळ शारीरिक मूलभूत गरजा असतात, मात्र संवाद ही आपल्या अंतर्मनाची मूलभूत गरज असते. आपल्याला संवादाची गरज खरेच असते. संवाद म्हणजे आपल्या जिवंतपणाचे एक महत्वाचे लक्षण मानले जाते. आपल्या अंतर्मनांत येणाऱ्या विचारांना आपण वेळोवेळी मोकळी वाट करून द्यायची असते, विचारांची देवाणघेवाण करायची असते. आपल्या भावनांना वाट मिळाली कि एक प्रकारे अंतर्मनांत आनंद प्रसूत व्हायला लागतो. ह्याच कारणास्तव आपल्याला संवादाची गरज असते. काहीवेळा आपल्या आपापसातील संवादाची सुरुवातच विसंवादाने होत असल्याचे दिसून येते. संवादाचा आभाव माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचे एकमहत्वाचे कारण असते. संवादाचे सुख प्राप्त करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार अंगीकारण्याची गरज असते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर
आपले व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसे असू शकेल, हे ठरत असते.



आधुनिक केसरी

## रामकृष्ण हरि | मुक्ती मंत्र |||

सुख दुःख | आम्हा नसे भेदाभेद ||
अंतरीची साद | ऐक्य साधे ||१||
वैष्णवांचे कुळी | अद्वैताचा भाव ||
विटेवरी देव | आत्मरूप ||२||
सोन्याचा पिंपळ | वैभव आमुचे ||
दास विठोबाचे | सदानंदी ||३||
ओढ लावी जीवा | संजीवन वारी ||
रामकृष्ण हरि | मुक्ती मंत्र ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

येक म्हणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग ।
वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ॥ ३१ ॥
येक म्हणती हा वांचेना । येक म्हणती हा मरेना ।
भोग भोगितो यातना । पापास्तव ॥ ३२ ॥
गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला ।
प्राणी बहुत कष्टी जाला । संसारदुःखें ॥ ३३ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सेवा सन्तन की करो, एक आवै एक जाय ।
सत्संगति जीवन बने, सुमिरन भजन समाय
।।४८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/४८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
गृहस्थांच्या घरी संतांचे सतत येणे-जाणे असावे आणि गृहस्थांनी त्या संतजनांची सदैव श्रद्धायुक्त सेवा करावी. त्यांच्या सत्संगतीने जीवन घडते आणि प्रभूच्या सुमीरन, भक्तीने आत्मा अंतर्मुख प्रवेश करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी



केल्याने होत आहे रे । आज आपल्या जीवनात अपयश आणि दुःख दिसत असेल, तर त्याला आपले अधीर आणि उतावीळ मन कारणीभूत आहे. बहुसंख्य लोक आज सुख, आंनद, यश, कीर्ती, ऐश्वर्य, अधिकार मिळवण्यासाठी अधीर आणि उतावीळ झाले आहेत. परंतु त्यासाठी शांतपणे आणि सातत्याने कराव्या लागणाऱ्या परिश्रमाचा अभाव दिसून येत आहे. आपल्या हिंदुस्थानी संस्कृतीत विद्या, कला अथवा अन्य कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी बारा वर्षाचे परिश्रम आवश्यक मानले आहेत. या सतत केलेल्या प्रयत्नांनाच 'तप' असे म्हटले जाते. आपला प्राचीन इतिहास वाचला म्हणजे खऱ्या धैर्याची कल्पना येऊ शकेल. जगातील सर्व देशात आणि सर्व काळात जे विद्वान, ज्ञानी, ध्येयवादी, यशस्वी संत, महंत, कलाकार वीर पुरुष होऊन गेले त्यांनी जीवनातील धैर्याची पुंजी कधीही संपू दिली नाही. म्हणूनच परिस्थितीवर मात करून ते यशस्वी झाले. अंतःकरणात श्रद्धा असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र कर्तव्य, ध्येय, उपासना या गोष्टी जगात सर्वश्रेष्ठ आहेत. तनाने, मनाने, धनाने आणि प्राणपणाने मला त्या पूर्ण केल्या पाहिजेत, अशी ज्याची दृढ श्रद्धा असेल त्याच्याच अंतःकरणात धैर्य उत्पन्न होईल. साडेतीनशे वर्षापूर्वी, राजकीय राजवटीत जेव्हा हिंदुस्थानी जनता भयभीत झाली होती, तेव्हा श्री समर्थांनी आपले बाहू उभारून खणखणीत वाणीने लोकांना सांगितले -


**धिर्धरा धिर्धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।**
**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ॥**

मसूर या गावी रामनवमीचा उत्सव करून समर्थांनी आपल्या लोकोद्धाराच्या कार्याचा पाया घातला. शके १५७० मध्ये त्यांनी चाफळास राममंदिराची स्थापना केली. काही वेगवेगळ्या गांवी त्यांनी सुरुवातीला मारुतीच्या अकरा मंदिरांची स्थापना केली आणि नंतर गावोगावी. समर्थ रामदास यांनी देशभरात स्थापन केलेले एकूण अकराशे मठ आहेत. 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।' यासाठी त्यांनी काया झिजविली. हरिकथा निरूपण, राजकारण; सावधपण व साक्षेप या तत्त्वांच्या आधारे कार्य करणारा 'रामदासी' संप्रदाय त्यांनी निर्माण केला. या माध्यमातून संघटना बांधत, त्यांनी ठरवलेले कार्य सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार लोकसंग्रहाचा अचाट उद्योग त्यांनी मांडला. समर्थ रामदासांच्या 'जय जय रघुवीर समर्थ' या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला. दऱ्याखोऱ्यातून, डोंगर कपारीतून एकच नाद घुमला. सह्याद्रीच नव्हे तर गंगायमुना आणि कावेरीची खोरीही या घोषणेने दणाणून टाकली.

## भगवंताच्या नामानेच वासनाक्षय

आधुनिक केसरी

आपण सर्व जीव वासनेत गुंतलेले आहोत, कारण आपला जन्मच वासनेत आहे. वासना म्हणजे, 'आहे ते असू द्याच, आणि आणखीही मिळू द्या' असे वाटणे. आपण सध्या या स्थितीत आहोत. पण सुरुवात म्हणून आपण असे म्हणावे की, 'आहे ते असू द्या, आणि आणखी मागायचे ते परमेश्वराजवळ मागू या.' म्हणजे, मिळाले तर 'भगवंताने दिले', आणि न मिळाले तर 'त्याची इच्छा नाही', अशी जाणीव होऊन 'दाता परमात्मा आहे' ही भावना वाढू लागेल; आहे तेही त्याच्याच इच्छेचे फळ आहे असे वाटू लागून अस्वस्थता आणि आसक्ती कमी होऊ लागेल; आणि आसक्ती कमी होऊ लागली की, 'हवे-नको' कमी होऊन वासना ओसरू लागेल. केवळ आपल्या कर्तबगारीने वासनेच्या पलीकडे जाणे अशक्य आहे; त्याला शरणागतीशिवाय गत्यंतर नाही. याकरिता योग्य संगतीचाही फार उपयोग होईल. एखाद्या बैराग्याची संगती केली तर स्वाभाविकच कपड्याचे प्रेम कमी होईल, पण एखाद्या शेटजीच्या संगतीत राहिलो तर छानछोकी करण्याकडे प्रवृत्ती होईल. म्हणून अशा संगतीत



राहावे की, ज्यामुळे शरणागती यायला मदत होईल.
शरणागती म्हणजे परमेश्वराला सर्वस्वी अर्पण होऊन राहणे; याचाच अर्थ, आपण उपाधिरहित बनणे. तर मग आपण अशाच साधनाची संगती केली पाहिजे, की जे अत्यंत उपाधिरहित आहे.

हे साधन म्हणजे भगवंताचे नाम. काळ, वेळ, परिस्थिती, उच्चनीच भाव, स्त्री-पुरुष, विद्वता-अडाणीपणा, श्रीमंती-गरिबी, प्रकृतीची सुस्थिती-दुःस्थिती वगैरे कोणतीही गोष्ट नामाला आड येऊ शकत नाही. तसेच, त्याला कोणतीही उपकरणे लागत नाहीत. ते हृदयात सतत आपल्याबरोबर बाळगता येते. नामात वैराग्याचे कष्ट नाहीत, आणि कुठेही, केव्हाही ते बरोबर नेता येते. त्यासाठी विषयाची तदाकारवृत्ती सोडली पाहिजे. 'भगवंत माझ्या मागे आहे' अशी श्रद्धा राखली की वृत्ती विषयाशी तदाकार होत नाही. मारुतीने दिलेली मुद्रिका पाहिल्यावर सीतेला रामाच्या स्वरूपाची आठवण झाली, त्याप्रमाणे नाम घेताना आपल्याला त्याची आठवण झाली पाहिजे. भगवंताच्या अनुसंधानात जो राहिला त्याने काळावर सत्ता गाजविली. अशा लोकांना मरणाचे भय कुठून असणार ? भगवंताला सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरत नाही; आणि जिथे वासना उरली नाही तिथे काळाचा शिरकाव होत नाही. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. वासनेच्या क्षयामध्ये आपलेपणाचे मरण आहे, आणि हे मरण डोळ्यांनी पाहण्यासाठी आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# गाळे वाटपाचा लिलाव पारदर्शी :भोकर बाजार समितीचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीचे किनवट रोडवरील पाच व्यापारी गाळ्याचा वाद न्यायप्रविष्ट होता. न्यायालयाने बाजार समितीच्या बाजूने निकाल जाहीर केल्यानंतर गुरुवारी (ता. १६) संचालक मंडळानी कायदेशीर रीत्या पारदर्शी पद्धतीने लीलाव केला आहे, अशी माहिती मंडळानी पत्रकार परिषदेत दिली आहे. येथील बाजार समिती दिवसेंदिवस नारूपाला येत आहे.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी जातीने लक्ष घालून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतल्याने त्यात भर पडली आहे. बाजार समितीच्या ताब्यात असलेल्या पाच व्यापारी गाळ्यावर नरसिमलू गंदेवार,नागेश गंदेवार,विलास पोपशेटवार, सुनील बच्चेवार,महेश गाढे या पाच व्यापा-यानी ताब्यात घेतले होते.सदरील व्यापा-यानी येथील न्यायालयात दावा दाखल केला पण तो सिध्द झाला नाही. १२ जानेवारी २०१७ रोजी आदेश खारीत केल्याने जिल्हा अतिरिक्त न्यायालयात दावा केला.याप्रकरणी१० जूलै२०१३ निर्णय दिला त्या निर्णया विरूद्ध व्यापा-यानी उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचीका दाखल केली.न्यायालयात सक्षम बाजु न मांडल्याने ३० आगस्ट२०२३ रोजी प्रकरण निकाली काढले आहे. निकाला नंतर बाजार समितीच्या संचालक मंडळांनी १२आगस्ट २०२१ लिलावासाठी बैठकीत ठराव घेतला व पणण महासंघ पुणे येथे प्रस्ताव सादर केल्याने नियम व अटिस आधिन राहून २३ सप्टेंबर २०२३ रोजी लिलावास मान्यता दिली आहे. २७ मे२०२१ व्यापा-याच्या ताब्यात असलेले गाळे पोलीसा समक्ष खाली करण्यात आले आहे.नवीन संचालक मंडळांनी १४ आगस्ट२०२३ बैठकीत २१वर्षाच्या लीजवर देऊन अधिक रक्कम देणा-यास प्राधान्य देवून लीलाव करण्याचा ठराव एकमताने घेतला. ३ नोव्हेंबर २०२३ रोजी वृत्तपत्रात लिलावाची सुचना प्रसिद्ध करण्यात आली. नजर चुकीने तारखेत बदल झाल्याचे लक्षात आल्यावर शूध्दिपत्रक प्रसिद्ध करून दूरूस्ती करण्यात आली आहे ते बाजार समितीच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आले आहे.२८ व्यापा-यानी लिलावासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये भरले असून बाजार समितीकडे एकुण ५० लाख ४१ हजार रुपये प्राप्त झाले आहेत.

येथील बाजार समितीत आजपर्यंत कुठल्याच बाबतीत गालबोट लागेल असा व्यवहार केला नाही .काहि अतिउत्साही कार्यकर्त्यांनी प्रसिद्धीच्या मोहात पडून समितीला बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे . संचालक मंडळानी नियमानुसार पारदर्शी पद्धतीने गाळे लीलाव केला आहे . विरोधक बिनबुडाचे आरोप करीत आहेत . यास जनता ही ओळखून आहे .भविष्यात प्रतिमा डागाळेल असे काम कदापी करणार नाही . (**सभापती,जगदीश पाटील भोसीकर, भोकर**)



# 'आकडा'तील शेतकऱ्यांच्या समस्या आजही कायम : अभिनेते संभाजी तांगडे

## दिवाळी गावाकडची : संगीत काव्य मैफल रंगली

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अस्मानी संकटे, शेतमालाला हमीभाव नाही, वेळेवर पाणी, वीज उपलब्ध न होणे, अनुदान, मदत न मिळणे, विकासाच्या योजनांत बोकाळलेला प्रशासकीय भ्रष्टाचार, अशा चौफेर गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या "आकडा" या नाटकाद्वारे समाजासमोर मांडल्या होत्या. राज्यभर प्रयोग सादर झाले, प्रयोगास उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला. मात्र दोन दशकांचा कालावधी उलटत आला तरीही शेतकऱ्यांच्या समस्या आजही कायम असल्याची खंत सिने-नाट्य अभिनेते संभाजी तांगडे यांनी व्यक्त केली. गोदावरी प्रतिष्ठानच्या वतीने चितळी -पुतळी (ता. जालना) येथे प्रथमच दिवाळी पाडव्याच्या सायंकाळी "दिवाळी गावाकडची" या साहित्यिक उपक्रमांतर्गत भावकवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या कवितांवर आधारित उत्कर्ष थिएटर निर्मित "जागर कवितेचा" या संगीतमय काव्य मैफिलीचे आयोजन केले होते. या मैफिलीच्या उद्घाटन प्रसंगी संभाजी तांगडे बोलत होते. ज्येष्ठ कथाकार, समीक्षक प्रा. बसवराज कोरे, मसाप जालना शाखेचे सचिव पंडितराव तडेगावकर, ॲड. मधुकर लिंगायत, प्रा. रंगनाथ खेडेकर, सरपंच सौ. स्वप्ना वांजुळे, गोदावरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र वांजुळे यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रा. बसवराज कोरे यांनी आई-वडील दूर राहावेत अशा सध्याच्या संस्कृतीत आजीच्या नावे ग्रामीण भागात साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रम राबवले जातात हा वेगळा आदर्श आहे, असे नमूद करत "माय" या शब्दामध्ये खरी माया असून मम्मी म्हणजे साय नसलेले कोरडे दूध आहे" असे प्रा. कोरे यांनी सांगितले.पंडितराव तडेगावकर म्हणाले, की शहरात स्थायिक झाल्यानंतरही गावाकडची नाळ कायम राहावी, या दृष्टीने होत असलेला उपक्रम प्रेरणादायी असल्याचे सांगून चितळी पुतळीतील आठवणींना त्यांनी उजाळा दिला. प्रास्ताविकात आयोजक राजेंद्र वांजुळे यांनी शहरी भागात दिवाळी पहाट सारखे उपक्रम सातत्याने होत असतात मात्र ग्रामीण भागात शेतकरी महिला व रसिकांना अशा मैफिलीचा आस्वाद घेता यावा या उदात्त हेतूने सदर उपक्रमाचे आयोजन केले असून यापुढेही सातत्याने असे उपक्रम राबवले जातील अशी भूमिका वांजुळे यांनी स्पष्ट केली. याप्रसंगी निराधार भामाबाई उमप यांना दिवाळी भेट देण्यात आली.उद्घाटनानंतर "जागर कवितेचा" या काव्य मैफिलीत गायिका अंजली काजळकर, विनोद जैतमहाल, सतीश लिंगडे, सुमित शर्मा, रेखा चव्हाण या कलावंतांनी गावातील रानमातीतला तजेला मनमोहक असून त्याला कोणाची दिट लागू नये म्हणून दोन सख्यांचा संवाद, बहरात आलेले पीक घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांची दाणादाण उडवणारा पाऊस, कधी सख्याच्या आठवणीत चिंब भिजणारा पाऊस.., संसाराचा गाडा हाकताना स्वतःच्या भाव -भावना, दु:ख, वेदना लपवून निमूट जगणारी बाई आणि 'ती' निघून गेल्यावर नव-याची अस्वस्थ अवस्था, समाधीवर तेलवात लावताना तिचा त्याग आठवून होणारी त्याची तगमग, अत्यंत भावस्पर्शी रूपात नाट्यअभिनय, सोनेरी स्वप्नात रमलेल्या नवविवाहित जोडप्याचे एकमेकाला काहीतरी सांगण्याची असोशी 'सोनचाफ्याच्या फुला फुला फुला, गुपित माझ्या मनात लपलंय सांगते मी तुला!'

अशा अनेक भावस्पर्शी कवितांना संगीताची सुरेख साथ सोबत अभिनयाची जोड असलेल्या काव्य संगीत मैफलीने बोचऱ्या थंडीत रसिकांना मनमुराद आनंद मिळाला. सुप्रसिद्ध निवेदक प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी प्रसंगानुरूप अधून- मधून कवितांची पेरणी करत आपल्या खुमासदार निवेदनाद्वारे मैफिलीत चार - चाँद लावले. वेदांत कुलकर्णी व अनिकेत देशपांडे यांनी संगीतसाथ दिली. गायिका अंजली काजळकर व विनोद जैतमहाल यांनी "श्रावणातल्या घना" या संगीतद्ध रचनेने सुरूवात केली. पशुपक्ष्यांपेक्षाही माणूस हीन होत चालला असून लोभ, वाढता द्वेष, मत्सर यामुळे नष्ट झालेली मानवता याचे वास्तव चित्रण सतीश लिंगडे व सुमित शर्मा यांनी "पाखरं" या संवादी कवितेद्वारे मांडले. अंधार पांघरून मिठीत स्वतःला उधळून देणारी स्त्री अंगभर दंश सहन करते तरी ताठ असलेल्या 'ती' चे वर्णन "सरलं दळण, चुडा मोत्यांचा सारिते," ही रचना रेखा चव्हाण यांनी सादर केली. गायिका अंजली काजळकर यांनी सुमधुर आलापाची जोड दिल्याने उपस्थित महिला भावुक झाल्या, काहींचे डोळे पाणावले. खंबीर साथ देणाऱ्या तिच्या विरहात समाधीवर फुले वाहताना आठवणींना भरून आलेला त्याचा ऊर, अस्वस्थता याचे हुबेहूब चित्रण सुमित शर्मा यांनी अभिनयाद्वारे सादर केले, सोबतचा आर्त स्वर त्यास दुःखाचा हुंकार रसिकांनी अनुभवला. निसर्गाच्या दुष्टचक्राने मोडणारी घरं, संसार, उदासलेल्या गावच्या वेशी, असे ग्रामीण भागातील विदारक चित्र विनोद जैतमहाल यांनी "ढग पांगले,,पांगले,,, हाक पावसाला द्या रे...दु:ख पेटले भुईचे, कोणी विझवाया या रे....!" या सुरेल, लयबद्ध भैरवीने उंची गाठलेल्या मैफलीचा समारोप झाला. उतरोत्तर रंगलेल्या मैफलीस शेवटपर्यंत महिला, शेतकरी, तरुण रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली.



# अय्युब पठाण यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** हिगोंली येथील समृद्धी प्रकाशन संस्था यांच्यावतीने २०२३ चा स्व. मारोतराव कऱ्हाळे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार यंदा संभाजीनगर जिल्हयातून विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शाहू विद्यालय जायकवाडी येथील जेष्ठ शिक्षक तथा प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक अय्युब पठाण लोहगांवकर यांना सन्मानपूर्वक ऑनलाईन पध्दतीने भाऊबीजेच्या शुभ मुर्हूतावर बुधवार दि. १५ नोव्हेंबर २०२३ ला सकाळी ११ वाजता हा पुरस्कार वितरण करण्यात आले. या पुरस्कारासाठी अय्युब पठाण यांचे २९ वर्षाचे प्रदीर्घ सेवेचा उत्कृष्ठ अध्यापन अनुभव कार्यासाठी हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आलेला आहे.अय्युब पठाण लोहगांवकर यांची आजपर्यंत बारा पुस्तके प्रकाशित असून, मुले रंगली काव्यात या एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे २०० कार्यक्रम शाळा- महाविद्यालयात सादर झालेले आहेत. आता पर्यंत पठाण यांना ५२ राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले असून त्यांची पाणपोई ही कविता बालभारतीच्या इंग्रजी- हिंदी माध्यमाच्या इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ आहे. जेष्ठ शिक्षक तथा ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांना हा पुरस्कार मिळाल्याने शाळेतील सर्व शिक्षक- शिक्षिकांनी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जेष्ठ शिक्षक अय्युब पठाण यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# नवी मुंबई मेट्रो सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकार्पणच्या वादात अडकलेली नवी मुंबई मेट्रो अखेर शुक्रवार नवी मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. बेलापूर ते पेंधर असा पहिला टप्पा शुक्रवारपासून सुरु होणार आहे. मागच्या १४ वर्षांपासून नवी मुंबईकर या मेट्रोच्या प्रतीक्षेत होते. आता ही मेट्रो शुक्रवारपासून बेलापूर ते पेंधर अशा मार्गावर धावणार आहे. गैरसोय होऊ नये म्हणून उद्यापासून मेट्रो सुरु करण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत. बेलापूर ते पेंधर या मार्गाचा लोकार्पण सोहळा न करता मेट्रो प्रवासी सेवेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री म्हणाले, १७ नोव्हेंबर २०२३ पासून नवी मुंबई मेट्रोल प्रकल्पातील मार्ग क्रमांक १ म्हणजेच बेलापूर ते पेंधर या दरम्यान मेट्रो सेवा सुरु केली जाणार असून नवी मुंबईकरांचे मेट्रोचे स्वप्न साकार होते आहे. मेट्रोच्या रुपाने नवी मुंबईकरांना जलद, आरामदायी प्रवासाचा सक्षम पर्याय उपलब्ध होणार असून सीबीडी बेलापूरसह वेगाने विकसित होणाऱ्या खारघर, तळोजा नॉड यांना मेट्रोमुळे कनेक्टिव्हिटी लाभणार आहे.



# शरद पवारांचा इशारा

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आता दिवाळीनंतर पुन्हा एकदा अ‍ॅक्शन मोडमध्ये आले आहेत. सोलापुरात शेतकरी मेळाव्याचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शरद पवार उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमात भाषण करताना शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन मोठे नेते आणि आमदारांना इशारा दिला. यामध्ये एक आमदार हा राज्याचा मदत आणि पुनर्वसन विभागाचा मंत्री आहे. शरद पवार पहिल्यांदाच दोन नेत्यांच्या बद्दल इतके आक्रमक आणि टोकाचे बोलले आहेत. याशिवाय शरद पवार यांनी या दोन्ही नेत्यांबद्दल भीष्मप्रतिज्ञा घेतली आहे. त्यामुळे आगामी काळात या दोन्ही नेत्यांच्या अडचणीत वाढ होते का ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बबनदादा शिंदे आणि अनिल पाटील यांना मोठा इशारा दिला आहे. शरद पवारांनी शेतकऱ्यांना बबनदादा शिंदे यांच्या विरोधातील कागदपत्राचे पुरावे आपल्याकडे देण्याचे आवाहन केले आहे. त्यातून शरद पवार बंदोबस्त करणार असल्याचे म्हणाले आहेत. तर अनिल पाटील यांच्या मतदारसंघात आपण गेलो असून ते पुन्हा निवडून येणार नाहीत, असं शरद पवार म्हणाले आहेत. यावेळी शरद पवार यांनी आमदार बबनदादा शिंदे यांनाही मोठा इशारा दिला. इथल्या नेत्याने शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज काढले. त्याबाबत माझ्याकडे कागदपत्रे द्या. ती कागदपत्रे घेऊन आल्यावर मी त्याचा जो बंदोबस्त करायचा तो बंदोबस्त करतो, अशा इशारा शरद पवारांनी दिला. इथले नेतृत्व काही जणांवर दबाव आणत आहे. मात्र त्या दबावाला झुगारून आपण काम करूयात, असेही शरद पवार यावेळी म्हणाले. मंत्री अनिल पाटील यांच्या मतदार संघात मी दौरा केलाय. पुढील विधानसभेला ते निवडून येणार नाहीत, असा मोठा इशारा शरद पवारांनी दिला. आम्ही दिवाळीनंतर जागवाटपाबाबत चर्चा करून निर्णय घेऊ. लवकरच जागावाटप झालेलं पाहायला मिळेल. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यासोबतच काही स्थानिक पक्षाला सोबत घेऊन जागावाटप होईल, असे शरद पवार म्हणाले.




राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# खा.संजय राऊतांनी काँग्रेस पक्षावरच बाँब टाकला

आधुनिक केसरी

**देशाच्या आर्थिक राजधानीतील प्रदूषणावरून उच्च न्यायालयाने मुंबई मनपा आणि संबंधित यंत्रणांना फटकारले. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी बैठक घेऊन सूचना केल्या आहेत. वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या सूचना म्हणजे प्रदूषणाला मागे रेटण्यासाठी त्याच्याविरुद्ध घोषित केलेले युद्धच होय. या युद्धात टँक म्हणजे रणगाड्यांच्याऐवजी तब्बल एक हजार पाण्याचे टँकर उतरवण्याची सूचना लक्षवेधी आहे. रस्ते धुण्यासाठी पाण्याच्या टँकरचा उपयोग होणार आहे.**

या निमित्ताने कोरोना काळाची आठवण झाली. जगभरात कोरोनाचा तीव्र प्रादुर्भाव होता. भारताच्या पंतप्रधान महोदयांनी थाळ्या - टाळ्या वाजवण्याचे नागरिकांना आवाहन केले होते. त्यास लोकांतून चांगला प्रतिसाद मिळाला. टाळेबंदीने घरात कोंडले गेलेल्यांना तितकाच एक विरंगुळा होता. शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते खा.संजय राऊतांनी काल माध्यमांसमोर बोलताना जाहिरपणे सांगितले की, आगामी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात शरदचंद्र पवार आणि उद्धव ठाकरे या दोघांचेच वर्चस्व रहाणार असल्याची भविष्यवाणी केली. वास्तविक पहाता महाविकास आघाडीच्या सोबत राष्ट्रीय काँग्रेस पक्ष असताना त्यांच्यातल्याच सहकारी पक्षाच्या मुख्य प्रवक्त्याची भविष्यवाणी याचा अर्थ पवारांची राष्ट्रवादी आणि ठाकरेंची शिवसेना काँग्रेस पक्षाला नगण्य समजत असुन त्यांच्याविना महाविकास आघाडी मजबुत करण्याचा पडद्याआड प्रयत्न राऊतांनी सुरू केला असं म्हणायला हरकत नाही. काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले आणि विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार हे मान्यवर एवढी सापत्नपणाची भाषा घटक पक्षाच्या नेत्याकडून आली असताना मुग गिळुन का बसले?हा राजकिय संशोधनाचा विषय म्हणावा लागेल. दरम्यान भर दिवाळीत राऊतांनी सहकारी काँग्रेस पक्षावर बॉंब टाकुन हल्ला चढवल्यासारखीच परिस्थिती म्हणावी लागेल. महाविकास आघाडीत खा.संजय राऊतांची भुमिका अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाते. सत्तेसाठी स्थापना करताना जुळवाजुळव आणि नंतर टिकुन ठेवण्यासाठी त्यांचा सातत्याचा प्रयत्न राहिला. तब्बल अडीच वर्षे काँग्रेस पक्षाला सोबत घेवुन राज्यात सत्ता चालवली. मुख्यमंत्रीपदी उद्धव ठाकरे हे होते. वास्तविक पहाता सत्तेच्या काळातच काँग्रेस पक्षाला ठाकरे गट आणि शरद पवारांच्या गटाकडून सापत्यपणाची वागणुक मिळायची. तत्कालीन काळात काँग्रेसचे जेष्ठ नेते अशोक चव्हाणांनी या विषयावर अनेकदा तक्रारी देखील केल्या होत्या. कालांतराने शिवसेना फुटली, राष्ट्रवादी फुटली अपवाद काँग्रेस पक्षच बाजुला राहिला. राज्यात आता सत्ताधाऱ्यांमध्ये भाजपा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांची राष्ट्रवादी विरूद्ध महाविकास आघाडी असा सामना सुरू आहे. केंद्र आणि राज्यातल्या सत्ताधाऱ्यांविरूद्ध महाविकास आघाडी मजबुत असल्याचा दावा केला जात असला तरी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गट यांच्याकडून कुठंतरी काँग्रेसला बाजुला ठेवण्याचं कुटिल कारस्थान सुरू असल्याचं लक्षात येते. ज्याचा अनुभव काँग्रेसवालेसुद्धा घेताना दिसतात. मध्यंतरी ठाकरे गटाने डॉ.प्रकाश आंबेडकरांना जवळ करताना काँग्रेसला विश्वासात घेतलेले नाही. कारण काँग्रेस पक्षाचं आणि आंबेडकरांचं फार काही सुत आहे असे नव्हे. अजुन बोलणे सुरू असले तरी काँग्रेसला कळायला मार्ग नाही की उद्धव ठाकरे प्रकाश आंबेडकरांना गळ का घालतात? दुसऱ्या बाजुने लोकसभेसाठी काँग्रेस पक्षाचा दावा संपुर्ण राज्यावर असताना त्यांना केवळ दहा ते बारा जागा देण्याची भाषा केली जाते. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत पवार आणि ठाकरे गटांनी महत्वाच्या ठिकाणी काँग्रेस पक्षाला बाजुला ठेवुनच राजकारण केलेले दिसतं. एवढेच नाही तर अधुनमधुन संजय राऊत जाहिरपणे काँग्रेस पक्षावर टिका करतात. मध्यंतरी राष्ट्रीय राजकारणात राहुल गांधींच्या नेतृत्वावर राऊतांनी आक्षेप घेतला होता आणि आता तर काल राऊत यांची भविष्यवाणी काँग्रेस पक्षाला आवाहन देणारी वाटते. एकीकडे सोबत रहायचं तर दुसरीकडे लाथाळ्या मारायच्या आणि मग त्या काँग्रेसने सहन करायच्या हा खेळ महाविकास आघाडीकडे सुरू असलेला दिसतो. तीन भाऊ एकत्र असताना दोन भावांनी जीवाभावाने एकत्रित रहायचं आणि तिसऱ्या भावाला सावत्रपणाची वागणुक द्यायची अशा प्रकारचा खेळ महाविकास आघाडीचा अंतर्गत सुरू असलेला दिसतो. मुळात एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे की,प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या लोकांवर पवार आणि ठाकरे गटाचा विश्वास मुळीच दिसत नाही.अलीकडे काँग्रेस पक्षात अंतर्गत कलह देखील मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसतो. पक्षाचा केंद्रबिंदू नागपूर उपराजधानी असला तरी तिथे गटातटाच्या राजकारणाने पक्षाला चांगलेच घेरलेले आहे. काही दिवसापुर्वी एका बैठकीत नागपूरात कार्यकर्त्यांमध्ये गचुऱ्या धरण्यापर्यंत हिंमत गेली होती. पटोलेंना वाढत असलेला अंतर्गत विरोध आणि विजय वडेट्टीवारांची स्ववर्चस्वाची भुमिका यातच पक्ष गुरफटुन गेलेला आहे. संजय राऊतांनी मात्र काल दिवाळीच्या पाडव्या दिवशी काँग्रेस पक्षावरच बाँब टाकला. माध्यमांसमोर बोलताना संजय राऊतांनी भविष्यवाणी करून टाकली की, महाराष्ट्रात आगामी काळात पवार आणि ठाकरे या दोघांचेच वर्चस्व राहिल. नेमकं या बोलण्याचा अर्थ त्यांच्यात अंतर्गत कसा घ्यावा? त्यापेक्षा राऊतांनी चक्क काँग्रेसवाल्यांना सापत्न बोलुन एक प्रकारे इशारा दिला. एवढेच नव्हे तर आमच्या समोर काँग्रेस किती नगण्य आणि अस्तित्वहीन आहे? हे दाखवुन दिले. कारण तीन पक्षाची महाव्िकास आघाडी असताना राऊतांची भविष्यवाणी दोनच नेत्यावर येवुन थांबते याचा अर्थ काय? 2024 च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बाजुला ठेवुन आपण निवडणुका लढवाव्या अशा प्रकारची खेळी किंवा डाव राऊत टाकत नाहीत ना? असा प्रश्न पडतो. वास्तविक पहाता राऊतांच्या बोलण्यानंतर काँग्रेस पक्षाच्या निष्ठावान जेष्ठांच्या नाकाला मिरच्या झोंबायला हव्या होत्या? मात्र एवढी लाथ देवुन देखील प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अशोकराव चव्हाण, बाळासाहेब थोरात ही सारी मंडळी तोंडाला चिकटपट्टी लावुन बसली. एकानेही राऊतांना या बोलण्याचा जाब विचारला नाही. कदाचित काँग्रेसवाल्यांना देखील लोकसभा निवडणुक राज्यात स्वतंत्र लढवायची असावी तर दुसरीकडे संजय राऊतांनी तर दोनच नेत्यांची नावे घेवुन सहकारी पक्षात प्रमुख असलेल्या काँग्रेसवाल्यांना त्यांची अवकात दाखवुन दिली. हे सारं पाहिल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच राज्यात महाविकास आघाडी मोठ्या प्रमाणावर राजकिय दरी निर्माण झाली तर नवल वाटणार नाही. संजय राऊत यांचं सुचक वक्तव्य काँग्रेस पक्षासाठी फार मोठा इशारा दिसतो.कारण त्यांचं बोलणं ओठातुन आलं असलं तरी पोटातून आलेले असल्याने काँग्रेसवाल्याने सावध व्हायला हरकत नाही. नाहीतरी शरद पवारांच्या अधुनमधुन वेगवेगळ्या भुमिका आणि येणारी वक्तव्य ज्यापासुन काँग्रेस पक्ष गल्ली ते दिल्ली सावधच असतो. कुठल्याही क्षणी पवार साहेब काय निर्णय घेतील? यावर कुणाचाही भरवसा नसतो. राऊतांचं बोलणं यामागे पुर्वपीठिका किंवा त्याची कल्पना सिल्वर आणि मातोश्रीला नसेल असं नव्हे. शिवाय संजय राऊत हे शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते आहेत. प्रवक्त्याच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द पक्षच बोलतो म्हणजेच प्रवक्ता बोलतो असा अर्थ असतो. कदाचित एवढी मोठी जाहिर भुमिका प्रवक्ता म्हणुन राऊतांनी मांडणं म्हणजेच महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाला पुर्णतः बाजुला ठेवुन दोन गट कामाला लागल्याचं चित्र आणि तिच खरी भविष्यवाणी प्रवक्त्याच्या तोंडून बाहेर पडली म्हणायला हरकत नाही. यावर तात्काळ खऱ्या अर्थाने काँग्रेसकडून प्रतिक्रिया यायला हवी होती. अद्याप कुणी काही बोललं नसलं तरी कदाचित काँग्रेसवाल्यालाही महाविकास आघाडीचं भविष्य कळुन चुकलं असावा जेणेकरून यांनी सवतासुभा पकडला की काय? ही शंका आली तर चुकीचं वाटणार नाही. बघुया, काँग्रेसवाल्यांचा स्वाभिमान कितपत जागा होतो? आणि एवढी राऊतांची लाथ बसुन देखील हे सहन करत असतील तर मग कुठंतरी काँग्रेस पक्षच लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच हातघाईला आला की काय?





गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# अपयश हा शेवट नाही तर यशाचा आरंभ आहे

आधुनिक केसरी


**निरंतर अखंडित प्रयत्न चिकटी जिद्द दैदिप्यमान इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही प्रकारच्या अपयशाला घाबरण्याची आवश्यकता नाही.अपयश पचवता आल्या शिवाय यशाचा आरंभ होत नाही. अपयशाला कधीच नकारात्मक घेऊन चालत नाही धेय्य गठात असताना किंवा यशाच्या शिखरावर मार्गक्रमण करत असताना अनेक वेळा अपयशाला सामोरे जावा लागू शकते.यशाचा निकष हा प्रत्येकाच्या संदर्भात वेगवेगळा असतो. काहींना पाहिल्याच प्रयत्नात यश प्राप्त होत असतं तर अनेकांना अनेक प्रयत्न करावे लागतात.एकंदरीत निरंतर अंखडीत प्रयत्न असतील तर शेवटी यश मिळतच म्हणजे अपयश हि यशाची जननी असते.अपयश आलं म्हणून यश मिळणार नाही असं कधीच होतं नसतं.**

अपयश आलं म्हणजे यश मिळणार नाही. असफलता हि सफलतेचा पाया आहे.महणुन असफल झाल्यानंतर ,ताण तणाव न घेता ,नैराश्या मध्ये न जाता आपण जिथ कमी पडलो चुकलो त्यावर लक्ष केंद्रित करून पुन्हा प्रचंड मोठ्या जोमाने यश अर्जित करण्यासाठी कामाला लागलं पाहिजे .कारण असलफलेतुनच सफलता जन्म घेत असते . सफलता आणि असफलता यांचा खेळ म्हणजेच जीवन होय .प्रत्येक व्यक्ती च्या जीवनातील सफलता असफलता यांच परिगणित वेगळं असतं .जीवनातील कुठलिही असफलता हि अंतिम नसते.सफलता हि जीवनातील अशी एक सकारात्मक घटना आहे ज्याचे जीवनातील विविध बाबींवर वेगवेगळे परिणाम होतात . प्रत्येक व्यक्ती च्या जीवनातील सफलता असफलता याचं स्वरूप वेगवेगळे असते .आणि त्याचे परिणाम देखिल वेगवेगळे येणार हे नैसर्गिक तर आहेच पण तो निसर्गाने घालून दिलेला वस्तू पाठ सुद्धा आहे. मेरा पाणी उतरता देख किनारे पे घर मत बसा लेना मैं समुंदर हू लोटके जरूर आऊंगा . जीवनातील अनेक अपयश ,संकटं वादळं ,पचवल्या नंतर अनेक पराभव झाल्यानंतर एखाद्या सुवर्ण अक्षरांनी लिहावं असं यश किंवा एखाद्या विजय जीवनात मिळत असतो . मुळात कुठलिही असफलता हि शेवट ची संधी नसते .म्हणून असफलतेतुनच सफलता हि जन्म घेत असते. याची जाणीव ठेवून वेळोवेळी,पावलो पावली आपण जागृत आणि सजग असलं पाहिजे.मानवी जीवन आणि सफलता व असफलत यांचा घनिष्ठ संबंध आहे. जन्मा पासुन मृत्यू पर्यंतचा संघर्ष म्हणजे जीवन आणि या जीवनातील अनेक वेगवेगळ्या बाबी ,आपल्याला मिळविण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. झगडावं लागत अनेक सुख दुःखांचा सामना देखील करावा लागतो .अनेक लोका असे आहेत की त्यांना आपल्या जीवनात प्रत्येक बाब पहिल्याच प्रयत्नात मिळते. महणजे अगदी सहजा सहजी मिळते.किंवा फार प्रयत्न न करता सुद्धा मिळते याचा अर्थ प्रत्येकाला याच पद्धतीने सफलता मिळेल असं नाही .सफलतेच गणित हे प्रत्येकाच्या जीवनात वेगळं आहे. अनेकांना प्रयत्न करूनही ती बाब मिळत नाही .पण बहुसंख्य लोक हे पहिल्या प्रयत्नात सफलता मिळाली नाही तर मग मात्र ते थेट प्रयत्न करणं च बंद करतात .आणि खरा घोळ इथंच आहे. उलट सफलता का मिळाली नाही आपण असफल का झालो याचे सद्सद विवेक बुद्धी नुसार मुल्यमापन करून मंथन चिंतन करण क्रमप्राप्त आहे . तसेच अगदी बारकाईने निरीक्षण करून अपयश आलं म्हणून नाराज न होता न थकता .ताण तणाव न घेता अगदी सहज आणि ज्ञान पुर्वक संशोधन करून अगदी बाराकाईने असफलते च्या मुळाशी जाऊन सफलता मिळविण्या साठी प्रयत्न केला पाहिजे. आपली , शक्ति, ताकद, मनोधैर्य, जिद्द, चिकाटी, मेहनत, प्रचंड आत्मविश्वास आणि नियमित नियोजन बद्ध प्रयत्न केले पाहिजेत जेणेकरून कुठल्याही क्षणी असफलतेच रूपांतर सफलतेत होईल कारण सृष्टी च्या रचनेनुसार नैसर्गिक नियमानुसार असफलते च्या उदारातुन सफलता हि नेहमी जन्मला येत असते. पण त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सदैव नियमित न थांबता केली पाहिजे. प्रयत्न थांबले कि सगळं संपलं म्हणून असफलतेला सफलतेत परिवर्तित करे पर्यंत प्रयत्न थांबले नाही पाहिजे. एवढी क्षमता आपल्या मध्ये निर्माण झाली तर नक्कीच आपणं असफलते ला सफलतेत परिवर्तित करू शकतो.अगदी सहजपणे. म्हणून सदैव असफलते नंतर सफलता मिळणारच आहे कारण असफलता हि सफलतेची जननी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अखंड हरिनाम सप्ताह - एक सात्त्विक पर्वणी


डॉ.मुरहरी केळे

आधुनिक केसरी

**ह.भ.प.सोपानकाका केळे यांच्या पुण्यातिथीच्या निमित्ताने गेली सोळा वर्षे धाराशीव जिल्ह्यातील वाशी या तालुक्यातील केळेवाडी या अतिशय छोट्या खेड्यात टाळ, मृदंग आणि वीणा या सात्त्विक वाद्यांचा वापर करत भक्तिउत्सव चालू आहे. हा उत्सव आम्हा केळे कुटुंबियांना व केळेवाडीसह जवळपासच्या खेड्यातील भाविकांना एक सात्त्विक पर्वणीच असते. यावर्षीही दि.०५.११.२०२३ ते १२.११.२०२३ या आठ दिवसात तो उत्सव पार पडला. दररोज पहाटे पाच वाजता काकडा आरतीने सुरुवात होऊन देवाला हळुवारपणे जागे करण्याचे काम केले जाते.**

त्यानंतर सकाळी दहा वाजता तुकारामांच्या गाथ्यातील अभंग परंपरागत चालीत गायिले जातात, त्यात समाजमन रंगून जाते.

दुपारी तीन ते चार वाजेच्या दरम्यान ज्ञानेश्वरीतील सुंदर अशा निवडक ओव्यांवर प्रवचन होते. त्यानंतर संत ज्ञानेश्वररचित हरिपाठ घेतला जातो. रात्री ९.०० ते ११.०० च्या दरम्यान सुश्राव्य असे कीर्तन होते. त्यात कीर्तनकार अभंग सोडवताना कायिक, वाचिक, मौखिक अभिनय करत, संगीत, वाद्य यांचा वापर करून लोकांना भक्तिरंगात भिजवतो. त्यानंतर रात्रभर जागरण करताना भजन, अभंग गायन, गौळणी गायन किंवा भारूडांचा कार्यक्रम केले जातात. वीणा अखंडपणे गळ्यात घालून त्यावर 'राम कृष्ण हरी' हा जप केला जातो, त्यामुळे त्याला 'अखंड हरिनाम सप्ताह' असे म्हटले जाते. शेवटच्या म्हणजे आठव्या दिवशी ग्रंथदिंडी (गाथा मिरवणूक) वाजतगाजत आमच्या घरासमोर येते. सडा-रांगोळीने रस्ते सजलेले असतात. आमच्या घरासमोर वारकरी फुगड्या खेळून अहंकार, अभिमान विसरतात. लोक तृप्त होतात. माझे वडील गेल्यापासून आम्ही लौकिकार्थाने दिवाळीचा सण साजरा न करता काकांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने भक्तिरसात न्हात असतो. त्यासाठी प्रत्येक वर्षी आठ कीर्तने, सात प्रवचने करण्यासाठी वेगवेगळे महात्मे येऊन सेवा बजावत असतात. यावर्षी पहिल्या दिवशी ह.भ.प.श्रीनिवास महाराज जगताप (पंढरपूर) यांनी कीर्तनासाठी 'रुपपर' अभंग निवडला होता.

**आवडे हे रूप गोजिरे सगुण | पाहता लोचन सुखावले ||१|| आता दृष्टीपुढे ऐसाचि तू राहे |जव मे तुज पाहे वेळोवेळा ||धृ || वाचवले मन लागलीसे गोडे |ते जीवे न सोडी ऐसे झाले ||२ || तुका म्हणे आम्ही मागावे लडिवाळी |पुरवावी आळी मायबाप ||३||**

दुसऱ्या दिवशी ह.भ.प.निलेश महाराज चरेगावकर (धाराशिव) यांचे 'नामपर' अभंगावर कीर्तन झाले.

**विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा I करी पापा निर्मूळ II१ II भाग्यवंता छंद मनी I कोड कानीं ऐकती II धृ II विठ्ठल हे दैवत भोळे I चाड काळे न धरावी II २ II तुका म्हणे भलते याती I विठ्ठल चिती तो धन्य II३ II**

तिसऱ्या दिवशी ह.भ.प.हरिभाऊ महाराज कवडे (परभणीकर) यांनी 'संतमहात्म्यपर' अभंगावर सुश्राव्य कीर्तन केले.

**संतसमागम एखादिया परी । राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ॥१॥ तेथें रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥धृ॥ कामारी बटीक सेवेचे सेवक । दीनपण रंक तेथें भलें ॥२॥ तुका म्हणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ॥३॥**

चौथ्या दिवशी ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले (डिकसळकर) यांनी नर्मविनोदाची पखरण करत 'भक्तीपर' अभंग सोडवला.



**चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचे चरण अंतरे तें ॥१॥ आलिया वचन रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडी ॥धृ॥ मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देतो ॥२॥ तुका म्हणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥३॥**

पाचवी माळ ह.भ.प. अनिल महाराज पाटील बाभूळगावकर (आळंदी) यांचेही 'संतमहात्म्यपर' अभंगावर अभ्यासपूर्ण कीर्तन झाले.

**सोडिला संसार । माया तयावरी फार ॥१॥ धांवत चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगे ॥धृ॥ यानें घ्यावें नाम । तीसीकरणें त्याचें काम ॥२॥ तुका म्हणे भोळी । विठ्ठल कृपेची कोंवळी ॥३॥**

सहाव्या दिवशी अंकुश महाराज तळपे (पैठण) यांनी खालील अभंगावर जुन्या पद्धतीने सांप्रदायिक कीर्तन केले.

**आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥१॥ कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयाचा हरीख वाटे देवा ॥धृ॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥२॥ तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥३॥**

सातव्या दिवशी ह.भ.प.बालाजी महाराज बोराडे (परंडा) यांनी 'मागणीपर' अभंगातून देवाला कोणत्या प्रकारचे मागणे करावे यावर प्रबोधन केले.

**हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥१॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥धृ॥ न लगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥२॥ तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आह्मांसी ॥३॥**

तर हरिनाम सप्ताहाची सांगता करताना नेकनूर आणि पंढरपूर येथील मठाचे मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी काल्याच्या कीर्तनातून कृष्णचरित्र सांगितले.

**तुझिये संगति । जाली आमुची निश्चिति ॥१॥ नाहीं देखिलें तें मळे । भोग सुखाचे सोहळे ॥धृ॥ घरीं ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ॥२॥ तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥३॥** थोडक्यात पहिला, सातवा आणि काल्याच्या कीर्तनात कीर्तनकार बंधनात असतो. इतर दिवशी नामपर, संतपर, संत महिमा, नाम महिमा, भक्त, भक्ति महिमा इत्यादी अभंग घेऊ शकतात. हरिनाम सप्ताहातून श्रोत्याचा, साधकाचा पारमार्थिक उन्नतीचा प्रवास पायरी-पायरीने होतो. दररोजच्या कीर्तनातून ह.भ.प. सोपानकाका केळे यांच्या पुण्यस्मरणासह, सामाजिक प्रबोधन होत होते. हा भक्तिउत्साहाचा आनंदसोहळा संपूच नये असे सर्वांना वाटत होते.

# शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच!

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** नैसर्गिक संकटामुळे शेतातील उभे पीक गमावलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी अंधारातच गेली. शासनाने मदत जाहीर करून दिवाळीपूर्वी देण्याचे जाहीर केले. मात्र, अनेक शेतकऱ्यांना अद्यापही मदतीची प्रतीक्षा लागली आहे. शासन व मंत्र्यांचे आदेश हवेतच विरले असून शेतकऱ्यांना मदत मिळणार तरी केव्हा? असा प्रश्न निर्माण झाला आहे. अकोला जिल्ह्यात खरीप हंगामामध्ये अनियमित पाऊस झाला. जुलैमध्ये जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. काही भागांत अतिवृष्टी होऊन जमीन खरडून गेली. अतिवृष्टी व पुराच्या तडाख्यात जिल्ह्यात एक लाख ६८ हजार ८३३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणत नुकसान झाले. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकरी हवालदिल झाला. ३ ऑक्टोबर रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांसाठी दोन हेक्टरच्या मर्यादेत नुकसानीची मदत मंजूर करण्यात आली. दिवाळीच्या सणापूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळणे अपेक्षित होते. शासनाने देखील तसे वारंवार जाहीर केले. मात्र, दिवाळसण उलटून गेला तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसानीची मदत अद्याप मिळाली नसल्याचे चित्र आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाकडून मंजूर करण्यात आलेली मदतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या




खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत जिल्ह्यातील सातही तहसील कार्यालयांमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या तयार झाल्या आहेत. मात्र, तयार करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आलेली नाही. अतिवृष्टीग्रस्त दोन लाखावर शेतकऱ्यांना मदत प्राप्त झालेली नसल्याने त्यांची दिवाळी आर्थिक अडचणीतच गेली आहे. अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त सर्वाधिक शेतकऱ्यांची संख्या अकोला तालुक्यातील आहे. अकोला तालुक्यातील ५९ हजार ९८१, बाळापूर ४४ हजार ७८६, बार्शिटाकळी ४२ हजार ४६९, तेल्हारा ३९ हजार ६९६, मूर्तिजापूर १६ हजार १३३, अकोट दोन हजार ४३१ व पातूर तालुक्यातील ४४ शेतकऱ्यांचा समावेश आहे.




महाराष्ट्र Business Katta









# गावखेड्यातील दिवाळी !



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**वर्षभरात अनेक सण एका पाठोपाठ येत असतात व निघून जातात पण,एवढ्या सणांमधून दिवाळी सणाची मात्र सर्वजण आतुरतेने वाट बघत असतात कारण, दिवाळी हा सण सर्वात मोठा सण आहे व तो,खास करून पाच दिवसाचा सण आहे. ह्या सणाच्या निमित्ताने का होईना सर्वजण एकत्र जमत असतात व मोठ्या आनंदाने पाच दिवसाचा दिवाळी सण मिळून, मिसळून साजरा करतात. शहरात सुध्दा मोठ्या उत्साहाने साजरा करतात पण,गावखेड्यात मात्र दिवाळीचा सण जरा वेगळ्याच प्रकारे साजरा करण्याची प्रथा आहे. गावखेडा शेवटी गावखेडाच आहे त्याच्यात असलेली महानता, आपुलकी, स्नेह, आदर कदाचित जगाच्या पाठीवर कुठेही फिरायला गेल्याने बघायला मिळणार नाही ते, सर्व गावखेड्यात बघायला मिळत असते.**

गावखेड्यात जास्त करून शेतकरी, मजूर, गोर,गरीब लोक राहत असतात त्यामुळे ह्या तरी सणाच्या निमित्ताने ते,स्वतः तर आनंदीत असतात व थोडसं तरी वेळ काढून या सणाला महत्व देतात. त्यातच मात्र एक विशेष वेगळेपणा बघायला मिळत असतो,गावखेड्यातील एखाद्या कुटुंबातील मुलगा नौकरीवर शहरात राहत असेल व तो ह्या, दिवाळी सणाच्या निमित्ताने आपला कुटुंबासहीत गावात , घरी येणार असेल तर मात्र एका घरालाच नाही तर संपूर्ण गावाला आनंद होत असतो कारण तो मुलगा त्या गावातून लहान्याचा मोठा होऊन घडलेला असतो, त्याच्यात गावखेड्या विषयी असलेली आपुलकी पाहून अक्षरशः गावभरचे लोक त्याचे कौतुक करत असतात ते,आधीही बघायला मिळत होते आणि आजही काही गावखेड्यात बघायला मिळत असते पण, आता तेवढ्या प्रमाणात नाही पण, थोडेतरी बघायला मिळत असते आजकाल जग बदलत चालले आहे कदाचित आजकालचे लोक बदलत असतील असो. गावखेड्यातील दिवाळी कशी साजरी करतात त्यावर एक दृष्टी टाकूया! दिवाळी सणाचा पहिला दिवस म्हणजेच धनत्रयोदशी या दिवसाला गावखेड्यात कडूपाणी म्हणतात याचे कारण म्हणजेच जुने काही बुजूर्ग सांगत असायचे की,ह्या पहिल्या दिवशी पाणी गरम करण्याचा जो,मातीचा मोठा माठ असायचा त्याच्या भोवताली कडू दुद्याचा वेल गुंडाळत असायचे व आजही काही घरी गुंडाळतात खास करून या दिवशी सुरंदाची (सुरूंद कंदमुळ आहे) भाजी घरोघरी आवर्जून बणवतात.

पहिल्या दिवसापासून सकाळ, संध्याकाळी घरोघरी सडा रांगोळी करतात, शेणामातीने घर सारवतात व गाईच्या शेणाचा गोधन करून त्याची पूजा पाचही दिवस करतात. दुसऱ्या दिवशी नरक चतुर्थी व लक्ष्मीपूजन बरेचदा एकाच दिवशी येते त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवसाला भसीचा ( म्हैस) दिवस म्हणतात या दिवशी कोणी म्हैसीची पूजा करतात व लक्ष्मी मातेची सुद्धा मनोभावे पूजा करतात, तिसऱ्या दिवशी म्हणजेच बलिप्रतिपदेचा दिवस येतो हा दिवस गावखेड्यात प्रत्येक जणांचा आवडता दिवस आहे कारण ह्या दिवसाच्या निमित्ताने गावातील महिला, पुरूष,लहान मुली,मुले आपापल्या परिस्थितीनुसार नवीन कपडे किंवा, ठेवीचे कपडे घालून गावात मध्यभागी असलेल्या चौकात जमतात तिथेच चार, पाच टोपल्या शेण ठेवतात, शेतातील गवत (घोन्याड गवताचे नाव) त्यावर ठेवतात, पोळ्याच्या दिवशी घरोघरी जे,मातीचे वाटबैल बणवले जातात तेच वाटबैल आणून त्या शेणावर ठेवतात,एक अंडा ठेवतात काही वेळांनी गावपुजारी , गावकऱ्यांच्या तसेच गुराख्याच्या उपस्थितीत त्या गोधनाची पूजा करतो. थोड्याच वेळात गाई,वासरांना सजवून आणतात व त्या गोधनावरून हाकलतात तो क्षणच बघण्यासारखा असतो नंतर गाई, वासरांना, बैलांना चारण्यासाठी जंगलात नेल्यावर तेथे जमलेल्या महिला तान्ह्या मुलांना त्या गोधनावर झोपवतात व एकमेकीला गोधनाचा टिळा लावून नमस्कार करतात ही गावखेड्यात असलेली सर्वात मोठी प्रथा आहे तिला प्रथाच नाही तर गावखेड्यात असलेले संस्कार म्हणता येईल. एवढेच नाही तर लग्न होऊन गेलेली मुलगी जेव्हा पहिल्या दिवाळीला माहेरी येते तेव्हा त्या दोघांनाही ओवाळण्यासाठी गावातील महिला मोठ्या आनंदाने जातात त्यांना ओवाळतात व आशीर्वाद देतात, पाचवा दिवस म्हणजेच भाऊबीजेचा हा दिवस सर्वांना माहीतच आहे बहीण, भावाच्या अतूट नात्याचा दिवस बहीण माहेरी जाते तर काही भाऊ बहीणीच्या घरी ओवाळणीसाठी जातात. गावखेड्यातील दिवाळी आणि सर्वामध्ये दिसणारा आनंद गोड, थोड पदार्थ पेक्षा श्रेष्ठ दिसतो हा जिव्हाळा आणि आपुलकी गावखेड्यातच बघायला मिळत असतो व ही शिकवण कदाचित शहरातून मिळणार नाही तर गावखेड्यातूनच मिळत असते, दिवाळीचा सण तर जिकडे,तिकडे मोठ्या उत्साहाने साजरा करतात पण,गावखेड्यातील दिवाळी चा सण जरा वेगळ्याच प्रकारे साजरा केला जातो त्यातून काही तरी घेण्यासारखे असते भलेही त्यांच्याकडे अफाट धनसंपत्ती नसेल पण, कधी न मिटणारी खरी संपत्ती गावखेड्यातच आहे ती अशीच कायम राहो व या जगाला गावखेड्या विषयीची महानता कळो, व गावखेड्याची ओळख जगभर व्हावी, यासाठी सर्वांना दिवाळी सणा निमित्ताने हार्दिक शुभेच्छा प्रत्येकांच्या जीवनातील अंधकार दूर पळो, सुख, समृद्धी लाभो, निरोगी आयुष्य लाभो व एकमेकांच्याविषयी आपुलकी, स्नेह, जिव्हाळा निर्माण होवो.



# हवेच्या प्रदूषणाचे गांभीर्य समजून घेण्याची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**प्रदूषण हा भारतातील कळीचा मुद्दा असला तरी त्याकडे नेहमीच दुय्यम समस्या म्हणून दुर्लक्ष होत आले आहे. प्रदूषण हा फक्त शाळेत मुलांना निबंध लिहिण्यापूर्ताच मर्यादीत विषय राहिलाय काय? असा प्रश्न निर्माण होत आहे. याला कारण म्हणजे प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी पाहिजे त्या प्रमाणात प्रयत्न होताना दिसत नाही. वाढत्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणार्या दुष्परिणामांना वेळीच आळा घातला नाही तर, भविष्यात याचे अधिक गंभीर परिणाम होउ शकतात. हिवाळ्यातील हवेचे प्रदूषण व उन्हाळ्यात तीव्र उन्हामुळे याचा आरोग्यावर परिणाम होत असतो. प्रदूषण हा भारतातील कळीचा मुद्दा असला तरी त्याकडे नेहमीच दुय्यम समस्या म्हणून दुर्लक्ष होत आले आहे. प्रदूषण हा फक्त शाळेत मुलांना निबंध लिहिण्यापूर्ताच मर्यादीत विषय राहिलाय काय?**

असा प्रश्न निर्माण होत आहे. याला कारण म्हणजे प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी पाहिजे त्या प्रमाणात प्रयत्न होताना दिसत नाही. वाढत्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणार्या दुष्परिणामांना वेळीच आळा घातला नाही तर, भविष्यात याचे अधिक गंभीर परिणाम होउ शकतात. हिवाळ्यातील हवेचे प्रदूषण व उन्हाळ्यात तीव्र उन्हामुळे याचा आरोग्यावर परिणाम होत असतो. वाढत्या हवेच्या प्रदुषणामुळे वर्षाला लाखो लोक प्रभावित होत असता. यामुळे फुफ्फुस, किडनी, ह्रदय आणि सीपीओडीशी संबंधित गंभीर आजार होण्याचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज बनली आहे.



दिवाळीच्या आ पार्श्व भूमीवर देशभरातील अनेक शहरात हवेचे प्रदूषण धोकादायक पातळीवर आहे .मुंबई दिल्ली बिहारसह बारा शहरांमध्ये हवेची गुणवत्ता ढासळली आहे. पिगुसराई मध्ये हवेची गुणवत्ता सर्वात वाईट होती तिथे हवा गुणवत्ता निर्देशांक ३९९ होता तर पाटणामध्ये हा निर्देशांक३३४ होता. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर केलेल्या प्रत्यक्ष आकडेवारीनुसार आराह छपरा भागल्पुर राजगीर आहे सहा सर्व समस्तीपुर आणि कटिहार.आणि पूर्णिया शहरांमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक ३०० आणि त्याहून अधिक होता या शहरांमध्ये हवा प्रदूषित होण्यासाठी मुख्यत्वे मोठे धुलीकरण आणि सरपंच ऑक्साईड कारणीभूत आहे त्यातच फटाक्यांची भर पडल्याने आधीच वाईट हवा असणाऱ्या या शहरांमध्ये हवेची स्थिती अधिक बिकट झाली आहे हवा गुणवत्ता निर्देशांक ३०१ आणि ४०० दरम्यान असलेली हवा दमा आणि श्वसनाच्या आजाराच्या रुग्णांसाठी धोकादायक असते. मुंबई आणि पश्चिम भारतात नोव्हेंबर, डिसेंबरात हवेचे प्रदूषण वाढते. मुंबईला तीन बाजूंनी समुद्राने वेढलेले असल्यामुळे हवेतील प्रदूषणकारी घटक जलद विखरून जाण्याची खात्री असतानाही मुंबईची हवा वाईट किंवा अतिवाईट स्तरापर्यंत पोहोचते. यंदा ही हवा दीर्घकाळ वाईट असल्याची नोंद झाली. यासाठी वाऱ्यांचा मंदावलेला वेग तर कारणीभूत होताच. यासोबतच बांधकामांमध्ये झालेली वाढही कारणीभूत होती. मुंबईत जमिनीवरून समुद्राकडे आणि समुद्रावरून जमिनीवर वाहणाऱ्या वाऱ्यांचा प्रभाव दिसतो. हे वारे साधारण तीन ते चार दिवसांच्या अंतराळाने वाहतात.त्यातच दिवाळीचे फटाके फटाके यामुळे ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढली. मुंबईत हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. प्रदूषणाचा एक्यआय ३०० पेक्षा जास्त झाला आहे. मुंबईतील प्रदूषणाची ही सर्वोच्च पातळी आहे. मुंबईतील वाढलेल्या प्रदूषणामुळे दिवाळीत फटाके फोडण्यावर निर्बंध आणले आहे. तसेच आता मॉर्निंग वॉकला जाण्यास बंदी केली गेली आहे. मास्कचा वापर करण्याचा सल्ला आरोग्य विभागाने दिला आहे. मुंबईतील प्रदूषण वाढल्यामुळे मुंबईची तुलना दिल्लीशी होऊ लागली आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणामुळे श्वसन विकाराचे रुग्ण वाढले असल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे. मुंबईत दृश्यमानता सकाळी ११ पर्यंत चांगली होत नाही. यामुळे सकाळी जास्त अंतरावरील वस्तू, वाहन दिसत नाही. विशेष म्हणजेच मुंबईपेक्षाही पुण्याची हवा अधिक खराब झाल्याची नोंद भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या (आयआयटीएम) 'सफर' संकेतस्थळावर झाली आहे. त्यामुळे पुणेकरांनो आता आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.कानठळ्या बसविणारा आवाज. हवेत केवळ धूरच धूर अन् जागोजागी रस्त्यांवर फटाक्यांचा कचरा, असे चित्र दिवाळीमुळे सर्वत्र पहायला मिळत आहे. एका दिवसाच्या उत्सवानंतर पुण्याची हवा खराब झाल्याने आरोग्याविषयी चिंता वाढू लागली आहे. केवळ हवेचे प्रदूषण नाही, तर कचरा आणि ध्वनी प्रदूषणाचाही ताप अनेकांना सहन करावा लागला.दिवाळी म्हटले की फटाक्यांची आतषबाजी असतेच. विविध प्रकारच्या फटाक्यांमधील रासायनांमुळे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होते. इतकेच नाही, तर फटाक्यांच्या तीव्र आवाजामुळे ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढते. रविवारी (ता. १२) लक्ष्मीपूजन आणि नरक चतुर्दशीनिमित्ताने शहरासह उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणात फटाक्यांचा वापर झाला. यामुळे आता आरोग्यासाठी धोकादायक स्थिती पुण्यात निर्माण झाली आहे. हवेचे प्रदूषण माणसाच्या स्मरणशक्तीला बाधा आणते, त्यांना वैफल्यग्रस्त करते, असे ओहियो स्टेट विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी शोधून काढलंय. प्रदूषित हवेत श्वसन केल्याने, माणसाच्या मेंदूतील जडणघडणीवर विपरीत परिणाम होतो, असे तिथल्या संशोधनातून सिद्ध झालं आहे. उंदरांवर केलेल्या प्रयोगात, तिथल्या संशोधकांनी मेंदूतील हिप्पोकॅम्पस या स्मरणशक्ती, शिकणे, भावावस्था यांच्याशी निगडित असलेल्या भागाचा सखोल अभ्यास करून सदर निष्कर्ष काढला. माणसाच्या वाढत्या चंगळवादामुळे हवेचे प्रदूषण होत आहे आणि आपण स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेत आहोत. कॅनडातील एका अर्थतज्ज्ञांच्या तुकडीने हवेतील प्रदूषण आणि लोकांचा आनंद यातील संबंध स्पष्ट करणारा दीर्घ आढावा घेतला आहे. त्यांनी 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ ग्रीन इकॉनॉमिक्स' या जागतिक नियतकालिकात आपला शोधनिबंध प्रकाशित करून वातावरणातले हवेचे प्रदूषण आणि नागरिकांची आनंदी वृत्ती यासंबंधी सविस्तर उहापोह केला आहे. हवेचे प्रदूषण वाढल्याने माणसे लवकर दुःखी होतात. इतकेच नाही तर ज्या देशातले नागरिक आनंदी नसतात, तिथे हे प्रदूषण अवाजवी आढळून आले आहे. हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे अनेकांना या प्रदूषणाचा त्रास होतो. अशा वेळी सर्वांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर नक्कीच आपले आरोग्य निरोगी राहण्यास मदत होईल.जर आपल्याला प्रदूषणाचा त्रास होत असेल तर आपण अशा वेळी प्रवास करणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. कोरोना जरी गेला असला तरी तो संपूर्णपणे बरा झालेला नाही. त्यामुळे मास्क वापरणे जरी सक्तीचे नसले तरी मात्र शारीरिक सुरक्षेसाठी मास्क वापरणे गरजेचे आहे. प्रदूषणापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी तुमची औषधं वेळेवर घेणे गरजेचे आहे.

# रस्ता कामात निव्वळ चालढकल

## काम करण्याची मुदत संपून सहा महिने उलटले

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कानडगाव/मंहमदपूर फाटा ते टाकळी राजेराय पर्यंत प्रधानमंत्री सडक योजनेतंर्गत रस्ता दर्जोन्नतीकरण खडीकरण डांबरीकरण काम ठेकेदार करवी विभागाने हाती घेतले आहे. काम वर्ष २०२२ पासुन सुरु झाले वर्ष उलटले काम करण्याची मुदत फेब्रुवारी २०२३ आहे. मुददत संपुन सहा महिने झाले तरी अद्याप मातीकरण खडीकरणचे काम सुरू आहे काम पुर्ण कधी होणार कामात सतत चालढकल अनियमितता सुरु असताना विभाग मात्र चिडीचुप मुग गिळून गप्प बसून आहे.हे विशेष. रस्ता दर्जोन्नती, रस्ता काम ३५५.५१लक्ष रुपयेचे असुण मातीकरण खडीकरण व डांबरीकरण तथा काही पुलाचे व सिमेंट रस्ता कामं यात समाविष्ट आहे. खुलताबाद तालुक्यातील कानडगाव/मंहमदपूर फाटा ते टाकळी राजेराय पर्यंत हे काम आहे. पुलाचे काम करताना वाळु नावाला तर दगडी पावडर चुरा कामाला ,कामावर पाणी मारण्याचा पत्ता नाही.तिच स्थीती मातीकरण खडीकरणाची आहे. कामाची सुरुवात दि.०९/०२/२०२२ तर काम करण्याची मुदत ०८/०२/२०२३ पर्यंत आहे वर्ष उलटले व कामाची मुदत संपून सहा महिने झाले तरी अद्याप मातीकरण खडीकरणाची कामा पर्यंत ची स्थिती व काम बंद चालढकल सुरु आहे.या संदर्भात विभागाला बातम्या द्वारे आवाज उठवून प्रशासनाला अवगत केले आहे.परंतु विभाग चिडीचूप मुग गिळून गप्प बसून आहे. या मोठ्या कामात काम मुदतीत पूर्ण झाल्यावर पाच वर्ष देखभाल दुरुस्तीची हमी आहे.त्यासाठी २४-२५ लक्ष रुपये खर्चाचे नियोजन आहे.मग हे काम कधी पुर्ण होणार हमीची मुदत संपल्यानंतर?.मतीकरण खडीकरण त्यात मुरुम व त्यावर पाणी टाकून दबाई असे प्रक्रिया असताना याकडे साईड कामाच्या ठिकाणी ना शाखाभियंता ना उपाभियंता मग कार्यकारी अभियंता दुरची गोष्ट आहे.हे बघण्यास कुणीच उपस्थित रहात नाही.जनतेच्या व शासनाच्या निधीचा योग्य वापर होताना दिसत नाही.या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री व मुख्यमंत्री कडे तक्रार करण्याची तयारी रस्त्यालगतच्या शेतकरी नागरीकांनी चालवली आहे.



# ज्येष्ठ नागरिकांचे स्नेहमिलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** उत्साही जेष्ठ नागरिकांसोबत आल्याने त्यांच्यापासून आणखी कार्य करण्याची प्रेरणा व प्रोत्साहन मिळते,जेष्ठ नागरिक हे ऊर्जेचे उगमस्थान असतात त्यांचा कुटुंबात व समाजात सदैव सन्मान व्हावा असे प्रतिपादन वैजापूर -गंगापूर तालुक्याचे कर्तव्यदक्ष विकास पुरुष म्हणून गणल्या जात असलेले आमदार प्रा,रमेश,पा,बोरनारे यांनी बुधवार(ता,१५) रोजी केले,निमित्त होते वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ द्वारे आयोजित दिवाळी स्नेहमीलन तसेच योगीराज सद्गुगुरू गंगागिरीजी महाराज यांच्या १७६व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे उत्कृष्ट आयोजन,नियोजन करून भारतीय अध्यात्म,संस्कृती,व नैतीकतेच दर्शन घडविणाऱ्या सप्ताह कमिटीचे अध्यक्ष आ,रमेश पा,बोरनारे व सदस्यांच्या सत्कार व सन्मानाचे तसेच संघाचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा यांनी वयाचे अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण केल्या बदल अभिष्टचिंतनाचे, आ,बोरनारे यांनी व प्रमुख पाहुणे माजी नगराध्यक्ष तथा वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती, व निवर्तमान नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी यांनी ही जेष्ठ नागरिकांना आरोग्यदायी जीवनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले,अध्यक्षस्थानी प्रकाश शेठ बोथरा होते,प्रमुख पाहुणे कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रामहरी जाधव ,जि,प,सभापती संतोष जाधव,पी,आर,चव्हाण ,अंजली जोशी ,पारस घाटे ,झुंबरलाल शर्मा,डॉ,एस, एम, जीशी यांची उपस्थिती होती,आरंभी भारत माता पूजन होऊन रामेश्वर गायकवाड यांनी प्रार्थना सादर केली,करण व भावेश बोथरा यांनी स्वागत गीतसादर केले प्रास्ताविक सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले,उपाध्यक्ष रवींद्र आप्पा साखरे,कोषाध्यक्ष सुरेश संत,बबनराव क्षीरसागर,बाबासाहेब गायकवाड,मुकुंदशेठ दाभाडे,अशोक धसे, सुभाष शेठ बोहरा,भगवानसिंह राजपूत, सौअलका साखरे, सौ,डिंपल बोथरा,सौ,किरण बोथरा ,सौ,संगीता भालेराव यांनी उपस्थितांचे स्वागत केले,संघाच्या वतीने आ,बोरनारे याना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले, तर प्रकाश शेठ बोथरा यांनी अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण केल्याबद्दल प्राचार्य वसंतराव ठोंबरे,प्रा,पी,एम ,शिंदे,अण्णासाहेब शेळके, संतोष शेठ बोथरा, कृष्णा कांबळे, जैन पाठशाळा चे राजेंद्र संचेती, सुभाष चाफेकर, पारस घाटे,उत्तमराव साळुंके व शहरातील जेष्ठ नागरिक यांनी शुभेच्छाचा वर्षाव केला, शेवटी रामेश्वर गायकवाड यांनी पसायदान गायिले व रवींद्र आप्पा साखरे यांनी आभार मानले.





# अखंड हरिनाम सप्ताह सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ता.खुलताबाद येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाला असून या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे 44 वे वर्षे आहे या अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान सात दिवस दररोज सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण त्यानंतर गाथा भजन दुपारी रामायण कथा आणि सायंकाळी हरिपाठ आणि हरिपाठ यानंतर सात ते नऊ या वेळेमध्ये दररोज सात दिवस विविध महाराजांचे कीर्तन सेवा होणार आहे त्यानंतर रात्री नऊ वाजता संपूर्ण गावासाठी दररोज सात दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे आणि अशा या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहासाठी भव्य अशा धर्म मंडपाची उभारणी करण्यात आली आहे आणि आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दि.21 नोव्हेंबर रोजी काल्याचे किर्तन होऊन भव्य महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.बाजार सावंगी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने या सप्ताहाचा लाभ घेतात आणि लाभ घ्यावा असे आवाहन बाजार सावंगी ग्रामस्थां तर्फे करण्यात आले आहे.

# पाडव्यानिमित्त पैठण शहर व्यापारी महासंघाचे स्नेहमिलन




आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** व्यापारी हा पैठण या पर्यटन नगरीचा केंद्र बिंदू असून व्यापार वाढीसाठी जे जे आवश्यक आहे अश्या सर्व योजना राबविण्याचे काम सध्या शहरात सुरू आहे.संत ज्ञानेश्वर उद्यानाचे 150 कोटींचे DPR पुर्ण झाले असून लवकरच ते काम सुरू करन्यात येणार आहे तसेच पैठण शहर व्यापारी महासंघाणे शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणी बाबत केलेल्या मागणीचा प्रामुख्याने विचार करणार असल्याचे आश्वासन पालकमंत्री तथा रोहयो व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांनी दिले.

पैठण येथे पैठण शहर व्यापारी महासंघातर्फे आयोजित दिपावली स्नेहमीलन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया यांनी स्वागत केले प्रास्ताविक सचिव बलराम लोळगे यांनी केले. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती पालकमंत्री संदीपान भुमरे साहेब,दूध संघाचे संचालक नंदलाल काळे,पोलीस निरीक्षक संजय देशमुख,नाथ मंदिर कार्यकारी विश्वस्त दादा बारे,शालिवाहन पतसंस्था अध्यक्ष किशोर चव्हाण, नंदलाल लाहोटी, दीपक आहुजा,राम आहुजा, सुरज लोळगे, सोमनाथ दादा परदेशी, निमेश पटेल, सौ.रेखाताई कुलकर्णी,संजय पापडीवाल, विजय पापडीवाल, जितुसेठ परदेशी,सुनील बलदवा, जुगलकिशोर लोहिया, नाथ पोरवाल,उमेश बाहेती,विलास पहाडे,किशोर भाकरे,राजू सारडा, डॉ. किल्लारीकर,सतिष लखोटीया, राधेश्याम तोष्णीवाल, कृष्णा लोळगे, ज्ञानेश्वर उगले,रामेश्वर सुसे,महेश मुंदडा, श्याम पंजवानी, सुनील रासने, रावसाहेब नलभे,बंडू आंधळे,तुषार पाटील, किशोर तावरे, महेश रासने, प्रकाश लोहिया, गणेश लोहिया, सुनील रावस,मधुसूदन मुंदडा, राधाकिसन लोहिया, जगदिश नागोरी, पंकज लोहिया आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, उपाध्यक्ष सचिन लखोटीया, हार्दिक सराफ, सुनील नलभे, प्रविण उदावंत, स्वदेश पांडे, योगेश लोहिया, उमेश तट्टू, बाळासाहेब पठाडे, बाळासाहेब आहेर, जगदिश लोहिया, लक्ष्मण लबडे,रतन परदेशी, सचिन उंडाळे, मनोज पहाडे, चंदन सोनारे, राजेश मानधने आदींनी परिश्रम घेतले.

# गीते परिवाराचा सर्वांसमोर आदर्श : माजी मंत्री थोरात

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** शंभर वर्षांचे आरोग्य मिळण्यासाठी स्वच्छ हवा, पाणी आणि चांगले अन्न मिळाले पाहिजे. यासाठी सक्षम शेती, विषमुक्त शेती काळाची गरज आहे. यासाठी निरंतर झटणारे कृषी पंढरीचे वारकरी स्व. कारभारी दादा गिते हे साक्षात पांडुरंगस्वरूप आहेत. म्हणूनच त्यांचा पुण्यस्मरण कार्यक्रमाचा सोहळा दरवर्षी पार पडतो. आयुष्यभर समाजाची सेवा करणाऱ्या ह्या व्यक्तिमत्वाला शतदा वंदन करतो प्रतिपादन आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांनी व्यक्त केले. सोनोशी येथील स्व. कारभारी दादा शिवार प्रतिष्ठानतर्फे कृषी आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना कृषी विज्ञान पुरस्कार वितरण आणि द्वितीय पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. श्री. पेरे पाटील पुढे म्हणाले की, लोक आरोग्यपूर्ण आणि दीर्घायुष्य जगले पाहिजे म्हणून काम केले. प्रत्येकाने चार झाडे लावणे आवश्यक आहे. प्लास्टिकचा वापर कमी झाला पाहिजे. अन्न पदार्थांतील भेसळ कमी व्हावी असेही नमूद केले. माजी मंत्री आणि विधिमंडळ पक्षनेते आ. बाळासाहेब थोरात म्हणाले की शेतीवर निष्ठा असणारे स्व. कारभारी दादा गिते यांच्यासारख्या मौलिक व्यक्तिमत्वामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांना दिशा मिळाली आहे. शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या ह्या परिवाराला गौरव करावा तेवढा कमीच आहे. कृषी क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव करतांना अत्यानंद वाटतो असे मनोगत व्यक्त केले.



# राष्ट्रीय पत्रकार दिनी वैजापुरात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधत गुरुवार(ता,१६)रोजी येथील नगर पालिकेच्या वैजीनाथ वाचनालयात सर्व वाचकांनी मराठी वृत्तपत्राची पायाभरणी करणारे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून देशातील,राज्यातील व वैजापूर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व पत्रकार बंधू-भगिनींना राष्ट्रीय पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देऊन लोकशाहीच्या या चौथ्या आधारस्तंभाचे अस्तित्व कायम राखावे अशी अपेक्षा व्यक्त केली, जेष्ठ वाचक व साहित्यिक धोंडीराम सिंह राजपूत यांनी उपस्थिताना राष्ट्रीय पत्रकार दिन बाबत माहिती देऊन पत्रकारांची भूमिका स्पष्ट केली, जेष्ठ वाचक पी,एन,क्षीरसागर यांनी सर्वप्रथम दर्पणकार बाळ शास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला,व तद्नंतर वाचक फेरोज खान, के,बी,बसवेकर, एन,जी,शिंदे,इकबालसिंग,रवींद्र साळुंके,संजय राजपूत,सहायक ग्रंथपाल गुलाबराव गायकवाड यांनी पुष्प अर्पण केले,शेवटी गुलाब गायकवाड यांनी आभार मानले



# घोटी बाजारपेठेत तांदळाला भाव

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** भाताचे कोठार असलेल्या इगतपुरी तालुक्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी यंदा गोड झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी भात उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या भावा पेक्षा अधिक भाव मिळणार आहे. यावर्षी घोटी बाजार समिती व भात व्यापारी यांची बैठक पार पडली. यावेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर लहाने व जेष्ठ संचालक ॲड. संदीप गुळवे, माजी आमदार शिवराम झोले, उपसभापती शिवाजी शिरसाठ, निवृती जाधव यांच्यासह व्यापारी असोसिएशन अध्यक्ष संजय चोरडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली आहे. दरम्यान इगतपुरी तालुक्यात भात शेती ही मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र मजुरी, खते तसेच वातावरण बदलामुळे येणारी रोग राई व पावसाचे कमी जास्त होणारे प्रमाण यामुळे बळीराजा मेटाकुटीस आला आहे. त्यामुळे घोटी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भात व्यापारी यांची बैठक पार पडली असून या बैठकीत इंद्रायणी भाताला ८० किलो वजनाला २३५० ते २४०० रुपये व इतर भात वाणाला २००० ते २२०० रुपये भाव देण्याचा निर्णय झाला असून शेतकरी वर्गाला ही आनंदाची बाब आहे. दरम्यान शासनाने ठरवून दिलेल्या भावा पेक्षा ही इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना अधिक भाव मिळणार आहे. सभापती ज्ञानेश्वर लहाने, जेष्ठ संचालक ॲड. संदीप गुळवे, उपसभापती शिवाजी शिरसाठ, माजी आमदार शिवराम झोले, निवृती जाधव, सुनील जाधव यांच्या निर्णयाचे तालुक्यातून स्वागत होत आहे. या बैठकीला माजी आमदार शिवराम झोले, जेष्ठ संचालक सुनील जाधव, भाऊसाहेब खातळे, नंदलाल पिचा, भरत आरोटे, अर्जुन पोरजे, रमेश जाधव, राजाराम धोंगडे, हरिदास लोहकरे, संपत वाजे, अर्जुन भोर,भाऊसाहेब कडभाने, रमेश जाधव, दिलीप चौधरी, मारुती आघाण उपस्थित होते.



# क्रांतिगुरू लहुजी साळवे यांची जयंती चिंचोली लिंबाजी येथे उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** चिंचोली लिंबाजी येथे १४ नोव्हेंबर रोजी भारताचे सशत्र क्रांतीचे जनक हजारों क्रांतीवीरांचे गुरूवर्य स्त्री शिक्षणाचे प्रणेते व मरेल तर देशासाठी जगेन तर देशासाठी असा मुलमंत्र अंगी बाळगणारे आदय क्रांतीगुरू क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांची २२९ वी जयंती साजरी करण्यात आली. गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, चापेकर बंधू , क्रांतीवीर भाऊ खैरे, रावबहादूर गोवंडे, क्रांतीवीर नाना छत्रे, महात्मा जोतिबा फुले, हे त्यांच्या पुण्यामधील गंजपेठ येथील आखाड्यातील शिष्य होते. अशी त्यांची ख्याती होती. यावेळी कडूबा लोखंडे, लक्ष्मणराव लोखंडे, श्रीनाथ लोखंडे, तातेराव भुजंग, नवाब शेठ, सतिश लोखंडे, विजय लोखंडे विलास लोखंडे, सुनिल लोखंडे, आणा लोखंडे, शिवराम लोखंडे, कारभारी लोखंडे, बापू लोखंडे, इ. ग्रामस्थ व सामाजिक पदाधिकारी उपस्थित होते.

# शेतीवरील हक्क सोडून दे म्हणत मारहाण करून एकाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील पिंप्री सदो येथे सोमवारी एका व्यक्तीचा शेतीच्या वादातुन खुन करण्यात आला आहे. सोमवार दि. १३ रोजी पिंप्री सदो येथे शेती क्षेत्राचे हक्क सोड पत्र करून द्या या मागणीसाठी कुटुंबातीलच काही लोकांनी संजय देहाडे व सासु मोनाबाई देहाडे यांना त्यांच्या राहत्या घरी मारहाण केली.

संजय देहाडे यांच्या डोक्यावर व पायावर लोंखडी गजाने जबर मारहाण केल्याने या घटनेत संजय देहाडे याचा जागीच मृत्यू झाला आहे. याबाबत संजय देहाडे यांची पत्नी चित्रा देहाडे यांनी इगतपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून फिर्यादीत म्हटले आहे की, उल्वला महेंद्र उबाळे, लताबाई बाळु उबाळे, नंदाबाई पटवर्धन उबाळे, पटवर्धन उबाळे यांच्या मुली सुरेखा, सायली, सोनी तसेच महेंद्र उबाळे, पटवर्धन उबाळे, यशवंत उबाळे, प्रथमेश उबाळे, सिद्धार्थ उबाळे यांनी कु-हाडी व लोखंडी गजाने मारहाण केल्याने संजय देहाडे यांचा मृत्यु झाला आहे. या बाबत इगतपुरी पोलीस ठाण्यात संशयित गुन्हेगारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेत महेंद्र पटवर्धन उबाळे, यशवंत पटवर्धन उबाळे, बाळु उबाळे, प्रथमेश उबाळे यांना अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजु सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक करत आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह बाजारसावंगीत भजन-कीर्तनाला प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मधे आयोजित भजन कीर्तनाला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. वर्ष ४४वे, सप्ताहाला प्रारंभ दि १४प्रारंभ झाले असून दि.२१रोजी हभप संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याचे किर्तन व तदनंतर महाप्रसादाने (भंडारा) सांगता होणार आहे. दैनंदिन भरगच्च कार्यक्रमात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिजागर हरिपाठ हरिकिर्तन नामांकित महाराजांचे दररोज भजन किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हभप पांडुरंग उगले महाराज तुकाराम जेहुरकर महाराज, उध्दव आनंदे महाराज, उध्दव महाडिक महाराज, चांगदेव काकडे महाराज, संजय पाचपोर महाराज नामांकित महाराज येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मधे भजन कीर्तन प्रवचन करत आहे व भाविक भक्तांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने तौबा गर्दी दिसून येते आहे हे विशेष. कार्यक्रमांसाठी भव्यदिव्य मंडप लायटिंग डेकोरेशन करण्यात आले आहे.



# ऊसदरासाठी स्वाभिमानीचे आंदोलन; ऊस वाहतूक रोखली

## ३१०० रुपये पहिला हप्ता जाहीर करा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वाभिमानी शेतकरी संघटना ऊस दराबाबत आक्रमक झाली असुन ऊसाला 3100 रपये भाव जाहिर करावा यामागणीसाठी गुरुवारी पैठण येथे आपेगाव नाक्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ऊसाची वहाने आडविले, जोपर्यंत साखर कारखानदार ऊसदर जाहीर करत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारे उसाची वाहतूक होऊ दिली जाणार नाही, अशी भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घेतली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. यावेळी विविध कारखान्यांची ऊस वाहने या वेळी अडवण्यात आली.

यावेळी शिवाजीराव साबळे, संतोष तांबे, महेश लांडगे, कृष्णा म्हस्के, शिवाजीराव धरपळे, बाबुराव बोरुडे, हनुमान लांडगे, कृष्णा भुसारे, मयूर लांडगे, गोवर्धन आवारे, भागवत मस्के, बबनराव ढाकणे, सुनील लांडगे, प्रवीण लांडगे ,भाऊसाहेब नरके, संदीप नरके,शिशुपाल औटे सह मोठ्या संख्येने स्वाभिमानीचे कार्यकर्ते पदाधिकार्यासह शेतकरी उपस्थित होते.



# शरद पवारांचा पक्ष वाढविण्याची जबाबदारी आता सर्वांची

## बाबाराव पाटील खडसे : युवा संघर्ष यात्रा २९ नोव्हेंबर रोजी वाशिम जिल्ह्यात

आधुनिक केसरी न्यूज



वसंत खडसे 9373578429

**वाशिम :** जीवनात यशस्वी व्हायचं असेल तर संकटांना डगमगून न जाता खंबीरपणे वाटचाल करायला हवी. संकटे ही तत्कालिक असतात आणि परिस्थिती कधीच एकसारखी राहत नाही.ती सतत बदलत असते. मात्र धैर्य आणि संयम बाळगला तर मोठ्यात मोठ्या संकटावर मात करून यशाचे शिखर सहज गाठता येते. अशी शिकवण देणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार साहेब यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात करिष्मा घडवून दाखविला आहे.




संकटावर मात करण्याची त्यांची शिकवण एक मैलाचा दगड ठरलेली आहे. त्यांची हिच शिकवण अंगीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्वीपेक्षा ही अधिक बळकट करण्याची जबाबदारी आता आपल्या सर्वांचीच आहे. आपण सर्व मिळून जिल्हयात राष्ट्रवादीला पुढे नेऊन अधिक बळकट करू. त्यासाठी आपण सर्वजण माझ्या पाठीशी सक्षमपणे उभे रहा..! असे आवाहन जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी केले आहे.ते वाशिम येथे आयोजीत केलेल्या बैठकीत बोलत होते.

पुढे बोलतांना बाबाराव पाटील म्हणाले, सद्यस्थितीत राजकारणात सर्वत्रतच अस्थिरता निर्माण झालेली आहे. राज्यात पक्ष फोडाफोडीचे षडयंत्र वापरून प्रगल्भ असलेल्या राजकीय पक्षाला खिळखिळे करण्याचा कुटील डाव खेळल्या जात आहे. त्याचा प्रत्यय काही महिन्यापुर्वी आपण सर्वांनीच अनुभवला आहे.मात्र शरदचंद्र पवार हे एक असं समीकरण आहे की, राज्यातच नव्हे; तर देशाच्या राजकारणात देखील केव्हढाही राजकीय वादळ निर्माण झालं तर ते अखेर शरद पवार यांच्या पायाजवळ येवून शमते हा इतिहास आहे. याची अनुभूती अनेक वेळा सर्व राजकारण्यांनी घेतली आहे. आजही त्याच अविर्भावात हा ८३ वर्षाचा अजिंक्य योद्धा समर्थपणे राजकारण पेलत आहे. दिल्लीश्वरापुढे कधीही न झुकलेला हा महारष्ट्राचा सह्याद्री भविष्यातही झुकणार नाही. मात्र, त्यांच्या इच्छा शक्तीला बळकट करण्यासाठी युवा आणि जेष्ठ कर्यात्यांची नितांत गरज आहे..! असे सांगताना जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापणेपासूनचा संपूर्ण इतिहास एकनिष्ठ कार्यकर्त्यांसमोर विशद केला.

दरम्यान, जिल्हयातील सर्व तालुका व शहर प्रमुखांना त्यांच्या जबाबदाऱ्या कशा पद्धतीने पार पाडायच्या या विषयी सविस्तर चर्चा सदर बैठकीत करण्यात आली. याप्रसंगी जिल्हयातील जेष्ठ नेते पांडुरंग ठाकरे, जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, युवक जिल्हाध्यक्ष अनंत काळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा वैशाली मेश्राम, जेष्ठ नेते हिंगणकर, सुनिल पाटील, वाशिम तालुकाध्यक्ष रमेश गोटे, मालेगाव तालुकाध्यक्ष भगवान शिंदे, रिसोड तालुकाध्यक्ष गजानन सरनाईक, मंगरूळपिरचे राजेश टोपले, मानोरा तालुकाध्यक्ष काशिराम राठोड, कारंजा तालुकाध्यक्ष मनोज कानाकिरड, सामजिक न्याय जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश चंदनशिव, ओबीसी जिल्हाध्यक्ष मनिष चिपडे, गौतम कांबळे, अजय मोतेवार आदीसह विविध पदाधिकारी व बहुसंख्य कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

### युवा संघर्ष यात्रेत बहुसंख्येने सहभागी व्हा ..!



राष्ट्रवादीचे युवा नेते आ. रोहीत पवार हे २९ नोव्हेंबर रोजी युवा संघर्ष पदयात्रा घेऊन यात्रेच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यात येत आहेत. त्याअनुषंगाने जिल्हयातील सर्व युवा व जेष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे यांनी केले आहे.

# धनगर आरक्षणप्रश्नी सरकारचे ५० दिवस पूर्ण; गणेश केसकर यांचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ता.खंडाळा येथे दि.१६ नोव्हेंबर पासून धनगर आरक्षण प्रश्नी सकल धनगर समाज खंडाळा तालुक्याच्या वतीने गणेश केसकर हे आमरण उपोषण करत आहेत. याबाबतचे निवेदन लोणंद पोलिस स्टेशनला देण्यात आलेले होते. त्यावेळी हणमंतराव शेळके, सचिन शेळके, महादेव शिंदे,रोहन धायगुडे, पवन धायगुडे, अनिल केदारी, विकास धायगुडे, दादा शेळके,पोपट धायगुडे,पैलवान नवनाथ शेंडगे, पंकज माने, संतोष खताळ, प्रकाश कुचेकर,दत्तात्रय धायगुडे,पैलवान नाना शेळके पोपटराव धायगुडे, पैलवान सुहास कांबळे इत्यादी समाज बांधव उपस्थित होते. निवेदनानुसार गणेश केसकर हे आमरण उपोषणास बसलेले आहेत.उपोषणास बसण्यापूर्वी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकास पुष्पहार अर्पण करण्यात आले. गणेश केसकर यांच्याकडून हातात ज्योत घेऊन लोणंद नगरपंचायत च्या भव्य प्रांगणापर्यंत रॅली काढण्यात आली.यावेळी सकल धनगर समाज उपस्थित होते.येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करण्यात आला.तसेच आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाच्या अशी घोषणा देण्यात आली.सकल धनगर समाज बांधवच नव्हे तर इतर जातीतील समाज घटकांनी तसेच सर्व राजकीय पक्षातील नेते मंडळींनी या आंदोलनास पाठिंबा दर्शविलेला आहे. यावेळी अनेकांनी आंदोलन स्थळी भेट देत स्वतःची मनोगते व्यक्त केली. आमरण उपोषणाच्या पहिल्याच दिवशी लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. आंदोलनकर्ते गणेश केसकर यांचे म्हणणे असे आहे की, आपला भारत देश स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झालेली आहेत आणि आपला भारत देश डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेवर,संविधानावर चालतो.त्या घटनेत सर्व समाजाला मूलभूत अधिकार दिलेले आहेत.तसेच धनगर समाजाला सुद्धा एसटी प्रवर्गातील आरक्षण दिलेले आहे. त्याची आज अखेर अंमलबजावणी झाली नाही.त्यासाठी चौंडी येथे धनगर समाजाचे काही समाज बांधवांनी आमरण उपोषण केले. त्यावेळेस सरकारने ५० दिवसाचा अल्टीमेटम दिला होता.त्याला पण ५० दिवस पूर्ण झालेली आहेत. झोपेचे सोंग घेतलेल्या सरकारला जाग येण्यासाठी धनगर समाजाच्या वतीने महाराष्ट्रामध्ये ठीक ठिकाणी उपोषणे,आंदोलने समाज बांधव करत आहेत.त्याला प्रतिसाद देण्यासाठी खंडाळा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने आमरण उपोषण करत असल्याचे म्हटले आहे.त्यानुसार दिनांक १६ नोव्हेंबर पासून गणेश केसकर हे लोणंद नगरपंचायत प्रांगणात आमरण उपोषणास बसलेले आहेत.धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने घेतलेले ५० दिवस पूर्ण होऊन सुद्धा कुठलीच हालचाल होत नसल्याने आमरण उपोषणाचा मार्ग गणेश केसकर यांनी पत्करलेला आहे.







# टिटवी येथे भव्य मिरवणूक काढून जननायक क्रांतिसूर्य बिरसा मुंडा जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील टिटवी येथे आदिवासी गावात सूर्य क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या 148 व्या जयंती उत्साहात साजरी जयंती निमित्त भारतीय आदिवास पॅन्थर संघटना जिल्हाध्यक्ष गजानन प्रल्हाद कोकाटे यांच्या वतीने गावात लोक जागृतीसाठी भव्य मिरवणूक काढण्यात आली. मा. सभापती ज्ञानेश्वर गणपत चिभडे या हस्ते सूर्य क्रांतिवीर बिरसा मुंडा या प्रतिमेचे पूजन करून मीरवणुकीची सुरुवात करण्यात केली. भारतीय आदिवास पॅन्थर संघटना जिल्हाध्यक्ष गजानन प्रल्हाद कोकाटे यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनावर प्रकाश टाकत बिरसा मुंडा वयाच्या १६ व्या वर्षापासून आदिवासी वर होणाऱ्या अत्याचारा विरूद्ध दंड थोपटले. समाजासाठी केलेल्या कामाची दिलेल्या बलिदानाची माहिती त्यांनी यावेळी दिली. काढण्यात आलेल्या मिरवणुकीत दशरथ सहादु कोकाटे,गजानन तनपुरे पोलिस पाटील, बाबाराव कृष्णाजी कोकाटे, विष्णु प्रल्हाद तनपुरे, पिराजी कोकाटे, मदन ढेबरे, सोनाजी इंगोले, व गावाती सर्व प्रतिष्ठीत मंडळी व युवा वर्ग यांनी मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन लोकजागृती केली.

# पत्रकारांमुळे लोकशाही टिकून : राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** भारतीय लोकशाही शासन प्रणाली अधिक प्रभावशाली, लोकाभिमुख व पारदर्शी करून ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य देशातील वर्तमानपत्रे व देशातील पत्रकार करीत आहेत. लोकशाही शासन प्रणालीतील चुकीची धोरणे, चुकीचे निर्णय, नागरिकांच्या हक्क व कर्तव्याला बाधक ठरणाऱ्या बाबी, समाज विघातक व राष्ट्र विघातक बाबी आपल्या लेखणीच्या माध्यमातून चव्हाट्यावर आणून त्या देशातील नागरिकांसमोर आणण्याचे काम वर्तमानपत्रे व पत्रकार अत्यंत प्रभावीपणे मांडून लोकशाही अबाधित राखण्याची भूमिका पार पाडतात आणि म्हणूनच वर्तमानपत्रांना लोकशाही शासन प्रणालीचा चौथा आधारस्तंभ म्हणतात. सद्यस्थितीत देशातील विविध बोगस प्रकरणे, घोटाळे, भ्रष्टाचार, अनीतीची कामे देशातील पत्रकारांनी अत्यंत निर्भीडपणे व रोखठोकपणे मांडून आपल्या पत्रकारितेचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. आजच्या सामाजिक, राजकीय तथा प्रशासनिक स्थितीची इत्थंभूत माहिती तसेच शासन व प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांच्या कृष्णकृत्यांना जनतेसमोर ठेवण्याचे कामही पत्रकारच चोखपणे बजावतात. त्यांच्या चांगल्या व लोकहिताच्या कामांना प्रसिद्धी देण्याची भूमिका पत्रकार बजावतात. समाजातील व समाजाच्या विविध क्षेत्रांतील चांगल्या व वाईट घटना संकलित करून त्याही पोहोचविण्यासाठी पत्रकारिता अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पत्रकारांनी वृत्त संकलन करताना त्या वृत्ताचे सामाजिक व भावनिक परिणाम याबाबत सदैव जागरूक असणे गरजेचे आहे. पत्रकारांनी जागरूकता, अभ्यासूपणा, निष्पक्षपातीपणा, आपल्या कर्तव्यात पारदर्शकपणा पाळण्याची गरज आहे. पत्रकारांनी सामाजिक सलोखा व सामाजिक सामंजस्य टिकविण्यासाठी आपल्या लेखणीचा वापर करावा, समाजात नागरिकांवर होणारे अन्याय, अत्याचार यांना वाचा फोडण्यासाठी निष्पक्षपाती लेखणी वापरावी.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# आघाडी धर्म पाळत लढाई जिंकायची आहे

## अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन : भोकरला दीपावलीनिमित्त लोकसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** विधानसभा मतदारसंघातील जनतेनी (कै. )शंकरराव चव्हाणावर जीवापाड प्रेम केल. आजही तोच जिव्हाळा आमच्या सोबत कायम ठेवला आहे. तूमच आभार मानण्यासाठी शब्द अपुरे पडतात.तालूक्यातील वैभव बघून विरोधक मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत.तुम्ही फक्त एकसंघ रहा येणाऱ्या काळात महाविकास आघाडीचा धर्म पाळत राजकीय लढाई जिकांयची आहे.असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी बुधवारी (ता.१५) केले आहे.

शहरातील (कै. डॉ.शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समिती आणि तालूका काँग्रेस कमिटीच्या संपर्क कार्यालयात दिपावलीच्या निमित्ताने जनतेला शूभेच्छा देवून लोकसंवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हा अध्यक्ष गोविंद शिंदे नागेलीकर, सौ.मंगारगणी अंबूलगेकर, सभापती जगदीश पाटील भोसीकर, उपसभापती बालाजी शानमवाड,माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर,तालुका अध्यक्ष भगवान दंडवे,बालाजी आंदबोरीकर, ताहेर बेग, सुलोचनाबाई ढोले, उज्वल केसराळे, पंकज पोकलवार, सुभाष नाईक, गंगाधर भोंबे, रमेश महागावकर, मधूकर गोंवदे, केशव पाटील पोमनाळकर यांची उपस्थिती होती. चव्हाण म्हणाले की,भोकर मतदार संघाशी चव्हाण कूंटूबीयांच अतूट नात आहे. एकमेकाच्या सुखदूखात हिरेरीन सहभाग घेतला जातो. दिवाळीत आपल्या जिव्हाळ्याच्या माणसाला शूभेच्छा देण हे माझ आद्यकर्तव्य आहे. खर तर सर्व सामान्य माणसाला सूख दिल तरच मनाला शांती मिळते. काँग्रेस पक्षाची तीच ध्येयधोरणे असल्याने आजही जनता पक्षासाठी झुकत माप देत आहे.तालूक्यातील विकासकामांचा चढता आलेख आहे.काहि बाबतीत कमतरता आहे ती पण येणाऱ्या काळात पुर्ण होतील.विरोधक मात्र गोड आश्वासने देऊन जनतेला झुलवत ठेवल आहे. आम्ही दिलेला शब्द पाळतो असे सांगितले आहे. प्रास्ताविक आणि आभार भगवान दंडवे यांनी केले आहे. डॉ.मनोज गीमेकर यांनी सुत्रसंचलन केल आहे. यावेळी बहूसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.



**कार्यकर्त्यानी सज्ज रहाव :** आगामी काळात निवडणुकीचा रणसंग्राम सूरू होणार आहे .विरोधक दूधात मीठाचा खडा टाकून नासाडी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत .त्याना थारा देऊ नका तुम्ही एकसंघ राहून काम केल तर त्यांची जादू चालणार नाही .राजकी लढाई जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे .

**पद सार्थकी लावा :** तालुक्यात पक्षाची ध्येयधोरणे सर्व सामान्य माणसा पर्यंत पोहचले पाहिजे आणि येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला बळकटी देण्यासाठी काम करण गरजेच आहे .नवीन पदाधिकाऱ्यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे त्यांनी केवळ पदाचे लेबल गळ्यात घालून मिरवू नये तर पक्षवाढीसाठी आणि जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहावे .असे मत श्री .चव्हाण यांनी व्यक्त केले आहे .

# शॉर्ट सर्किटमुळे ४ दुकानांना आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दि. १४ नोव्हेंबर रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास भाजीमंडी परिसरात अचानक सर्किटमुळे आग लागल्याने चार दुकाने जळून लाखो रुपयाचा नुकसान झाले. रात्री १०:३० वाजेच्या दरम्यान लागलेल्या आगेची माहिती मिळता शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून नगरपरिषद लोणार यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. मात्र लोणार अग्निशामन गाडीत सुरूच होत नसल्याने तत्काळ त्यांनी मेहकर येथील माजी उपनगराध्यक्ष जयचंद भाटिया यांच्याशी संपर्क करून मेहकर येथील अग्निशामन बोलवली. माहिती दिल्याच्या तीस मिनिटांच्या आत मेहकर येथील अग्निशामन गाडी घटनास्थळी पोहोचली व आगीला नियंत्रणात करण्यात आले. लोणार नगर परिषदची अग्निशामन गाडी तात्काळ पोहोचली असती तर आग लवकर आटोक्यात आली असती नगर परिषदेच्या नियोजन शुन्य कारभाराची चर्चा सर्वत्र होत होती. गावातील सर्व सामाजिक व राजकीय क्षेत्रातील लोकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे ठाणेदार निमेश मेहत्रे व त्यांचे पो.का गणेश लोंढे, विशाल धोंडगे, संजय जाधव ज्ञानेश्वर निकष, रतन वाणी, हरीढाकणे, घटना घटनास्थळी येऊन सहकार्य केले.या आगीत भाजीमंडी परिसरातील गोपाल किसन काळे यांच्या प्रेस दुकानाचे ८० हजार रुपयांचे,जगन्नाथ बळीराम मोरे यांच्या हेअर सलूनचे एक लाख रुपयाचे, महादेव शिवाजी गवळी यांच्या दुकानाचे १ लाख ६६ हजारांचे तर शेख नवाब शेख रसूल यांच्या शाही मटन शॉप याचे ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे माहिती तलाठी शेवाळे यांनी घटनास्थळी पंचनामा करुन दिला.



# इदगाह व रस्ताकामाचा सरपंचांच्या हस्ते प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील सावंगी -रेल रस्ता तथा चंदनठिका सार्वजनिक मुस्लिम समाज कब्रस्थान मधे ईदगाह रस्ता पेव्हर ब्लॉक बसवणे ढापा आदि कामाचे दि.१६ सरपंच मा.आप्पाराव सांडु पा नलावडे यांच्या हस्ते कामाचे प्रारंभ भुमिपुजन करण्यात आले. पदवीधर मतदार संघाचे मा.आमदार सतिष भाऊ पाटील चव्हाण यांच्या स्वइच्छा निधी तुन येथे सावंगी रेल रस्ता चंदनठिका सार्वजनिक मुस्लिम समाज कब्रस्थान मधे आत जाण्यास नाल्यावर ढापा, रस्त्यात पेव्हर ब्लॉक व इदगाहचे कामाचे सरपंच मा.अप्पाराव पाटील नलावडे, यांच्या हस्ते कामाचे प्रारंभ तथा भुमिपुजन करण्यात आले. यावेळी जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा, माजी सरपंच भिमराव नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे, गाव तंटामुक्तीध्यक्ष प्रकाश आबा, ग्रामपंचायत सदस्य पोपट काटकर,चेअरमन किशोर नलावडे, युवराज नलावडे,कमळाकर नलावडे, वकील अनिल पाटील, ठेकेदार अक्षय नलावडे,विशाल पाटील घुले,अनिल नलावडे, चांद खान पठाण, सय्यद लाल टेलर, शेख जफरशेठ, शेख अकिल शेठ,शेख शब्बीर, शेख नजीर मिस्तरी , सय्यद नवाब, सय्यद सुभान, सय्यद शफिक, सलमान शेख, आसीफ शेख, इब्राहिम शहा सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# घोटीत तरुणाच्या डोक्यावर, मानेवर कोयत्याने वार करून निर्घृण खून

## हत्येच्या घटनेनंतर संशयित आरोपी फरार

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** महत्वाची बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या घोटी शहरात पूर्ववैमनस्यातून तरुणाचा डोक्यावर व मानेवर कोयत्याने वार करून निर्घृण खून करण्यात आला. मंगळवार दि. १४ रोजी रात्री घोटी येथील जुन्या कोल्हार घोटी रोडवरील रामरावनगर येथे ही घटना घडली. तीन ते चार जनांच्या टोळक्याने प्रमोद गंगाराम शिंदे, वय ३६ वर्ष, रा. रामरावनगर याच्यावर कोयत्याने वार केल्याने त्याचा जागेवरच मृत्यू झाला. या प्रकरणी मयताचा भाऊ अमोल शिंदे यांनी घोटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सोमवार दि. १३ रोजी मयत प्रमोद शिंदे व संशयित कृष्णा उर्फ गणपत विनायक बोराडे, वैभव उर्फ बॉडी विनायक बोराडे यांच्या मध्ये रात्री हॉटेल मोरया समोर भांडण झाले होते. या भांडणाचा राग मनात धरून संशयित कृष्णा विनायक बोराडे, वैभव विनायक बोराडे यांनी मंगळवार दि. १४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास प्रमोद शिंदे घरी जात असताना त्याला गाठून कोयत्याने त्याच्या मानेवर, डोक्यावर व चेहऱ्यावर वार केले. या घटनेत प्रमोद शिंदेचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे खून झालेला तरुण आणि संशयित आरोपी यांच्यामध्ये चांगली मैत्री होती. यापूर्वी खून केलेल्या एका तरुणाला इगतपुरी पोलीसनी तीन गावठी पिस्टलसह अटक केली होती. या घटनेनंतर पोलीस उपअधिक्षक सुनील भामरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील घटनास्थळी दाखल झाले होते. हत्येच्या घटनेनंतर संशयित आरोपी फरार झाले असुन आरोपींना शोधण्यासाठी पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संदेश पवार, उपनिरीक्षक सुदर्शन आवारी, हवालदार विक्रम झाल्टे, मारुती बोराडे, शिवाजी शिंदे यांचे पथक रवाना करण्यात आले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर